# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## पुणे येथील फुरसुंगी उरुळी देवाची नगर परिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसाठी जागा मिळण्याबाबत

**(१) ६९९५ (३०-०४-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील नव्याने निर्माण करण्यात आलेल्या फुरसुंगी उरुळी देवाची नगर परिषदेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसाठी उरुळी देवाची येथील गायरान सर्वे नं. ३२१ मध्ये जागा मिळण्याबाबत मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर जागा नगर परिषदेला हस्तांतरण करण्याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी कार्यवाही केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-१२-२०२५) :** (१) होय खरे आहे.

(२) प्रशासक, फुरसुंगी- उरुळी देवाची नगर परिषद यांनी नव्याने निर्माण झालेल्या फुरसुंगी उरुळी देवाची नगर परिषदेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासाठी मौजे उरुळी देवाची (ता. हवेली जि. पुणे) येथील गायरान ग.नं. ३२१ मधील क्षेत्र हस्तांतरित करणेबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचे कार्यालयास दाखल केला होता. त्याअनुषंगाने तहसिलदार हवेली यांचेमार्फत सविस्तर चौकशी करुन सदरचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी हवेली उपविभाग पुणे यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/३६०/२०२५ दिनांक १५/०५/२०२५ (प्राप्त दिनांक २६/०५/२०२५) अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला आहे.

जागा मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहे जुन-२०२५ मध्ये सर्व संबंधित विभागांना जागा प्रदानचे अनुषंगाने अभिप्राय सादर करणेबाबत कळविले आहे.

त्यानुसार वन विभाग, जिल्हा परिषद, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे व मोजणी विभागाचे अभिप्राय येणेवर प्रलंबित आहेत. संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त होताच नव्याने निर्माण झालेल्या फुरसुंगी-उरुळी देवाची नगर परिषदेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेमार्फत शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील सामाजिक वनीकरण विभागासह रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत

**(२) ७०३८ (२७-०४-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील सामाजिक वनीकरण विभागासह रोजगार हमी योजनेंतर्गत इतर महामार्ग, राज्य मार्ग वा पोच मार्गाच्या बाजूला मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यावरण संतुलनासाठी वनस्पती प्रजाती संवर्धन आराखडा तयार करण्याबाबत तसेच दीर्घ आयुष्य असलेल्या वनस्पत्ती प्रजातीचा त्यामध्ये समावेश करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी किती वृक्ष लागवडीचे उद्दिष्टे व त्यात वृक्षाचे संवर्धन करण्यात येत आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यावरण संतुलनासाठी विशेष उपाययोजना व आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०९-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे,

(२) व (३) सामाजिक वनीकरण विभागामार्फत मग्रोरोहयो, कॅम्पा योजने मध्ये शासकीय गायरान, ग्रामपंचायतीच्या जागा, शासकीय जागा, शाळा, महाविद्यालये यांच्या मोकळया जागा तसेच रस्ता दुतर्फा, रेल्वे दुतर्फा, कॅनॉल दुतर्फा यांच्या मोकळया जागेवर वृक्ष लागवड करुन वातावरणातील निसर्गाचा समतोल राखला जातो.

सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीत सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड अंतर्गत सामाजिक वनीकरण परिक्षेत्र मुखेड मध्ये मग्रारोहयो अंतर्गत वृक्ष लागवडीची कामे करण्यात आलेली नाहीत.

तथापि, सन २०२०-२१ व सन २०२२-२३ मध्ये सदर परिक्षेत्रात राज्य योजनेअंतर्गत तरतुदीनुसार वृक्ष लागवड करण्यात आलेली असून, सन २०२१-२२ मधील ४० रोपवन व सन २०२२-२३ मधील ३९ रोपवन कामे पूर्ण होवून सदर क्षेत्र संबंधित यंत्रणेस हस्तांतरण करण्यात आले आहे.

तसेच सन २०२४-२५ मध्ये मनरेगा योजनेसोबत राज्य योजनांच्या अभिसरणांतर्गत (Top Up Model) मुखेड परिक्षेत्रास ४ कि.मी. क्षेत्रावर वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार ०४ कि.मी. क्षेत्रामध्ये २००० वृक्ष लागवड करण्यात आलेली असून त्यामध्ये निम, करंज, वड, पिंपळ, जांभूळ इ. दिर्घ आयुष्य असलेल्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. सदर कालावधीत करण्यात लावण्यात आलेल्या रोपांची अंदाजपत्रकातील तरतुदीप्रमाणे संगोपन, संरक्षण व देखभाल करण्यात येत आहे.

(४) दरवर्षी पर्यावरण संतुलनासाठी सामाजिक वनीकरण विभागामार्फत प्रचार प्रसिध्दी कार्यक्रम अंतर्गत प्रचार प्रसिध्दी केली जाते. तसेच वृक्ष लागवडीमध्ये लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी दरवर्षी जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये वनमहोत्सव कालावधी राबविला जातो. या कालावधीमध्ये शाळा, स्थानिक नागरीक, शासकीय संस्था, सेवाभावी संस्था यांना मोफत व सवलतीच्या दरामध्ये रोपांचे वाटप करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नगरपरिषद (जि. बीड) मुख्याधिकारी, यांच्याकडून झालेल्या अनियमिततेबाबत

**(३) ७०४७ (०१-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपरिषदेच्या बाबतीत दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी नगरपरिषदेमध्ये सर्व विभागाचा यथोचित आढावा बैठक घेण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामध्ये लेखा विभागाच्या बाबतीत व नगरपरिषद फंडाच्या बाबतीत ज्या तक्रारी प्राप्त होत्या त्यानुसार मुख्याधिकारी यांनी जा.क्र.बीनप/कावि/४७३ दिनांक ३१ जानेवारी, २०२५ नुसार नगरपरिषद कार्यालयीन प्रमुख व कर्मचारी यांना स्वत: पत्र व्यवहार करत सदरील माहिती बाबत सात दिवसामध्ये देण्याबाबत निर्देशीत केलेले असून दिनांक ०९ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान कोणत्याही स्वरूपाची माहिती प्रत्यक्ष ई-मेल, अथवा सोशल मिडियाद्वारे देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे जानेवारी २०२२ ते जानेवारी २०२५ या कालावधीतील नगरपरिषद फंडातुन केलेल्या विविध विकास कामावरील खर्चा बाबत रितसर माहिती मागवली असता मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांनी जा.क्र.बीनप/कावि/सा.बां./११/५८९ दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२५ रोजी ३० दिवसाची मुदत स्वत:च्या पत्रामध्ये उल्लेखीत केलेली आहे, या बाबतीत ३० दिवस झाल्यानंतर माहिती उपलब्ध होवू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गुंठेवारी व बांधकाम परवाना बाब्रतीत असंख्य तक्रारी प्राप्त असून त्यानुषंगाने मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांनी जा.क्र.बीनप/कावि./सा.प्र./४७४ दिनांक ३१ जानेवारी, २०२५ नुसार विभाग प्रमुख तथा कार्यालयीन कर्मचारी यांच्याकडे स्वत:च्या पत्रानुसार दिलेली असून मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांनी विलंब करत सर्व विषयाची माहिती लपविण्याचा हेतु ठेवून वरील सर्व पत्र व्यवहाराच्या आधारे कोणतीही भूमिका घेतल्याचे निदर्शनास आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नगरपरिषद बीड मुख्याधिकारी हे जाणीवपुर्वक मला विधीमंडळाने पारीत केलेल्या अधिकाराचा हक्कभंग करत असून या विषयी विधी मंडळाने वेळोवेळी पारीत केलेल्या सर्व परिपत्रकाचे अवलोकन होवून या विषयी रितसर कार्यवाहीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासोबत मुख्याधिकारी यांच्या दालनात दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत प्राप्त सूचनेनुसार संचिका अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी सर्व विभाग प्रमुखांना आदेशित केले होते.

स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक १७ मार्च, २०२५ व दिनांक १९ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) अंशतः खरे आहे,

सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दिनांक ०६ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये मा.लोकप्रतिनिधी यांच्याकडे ३० दिवसांची मुदत देण्याबाबत, तसेच दिनांक ११ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये १५ दिवसांची मुदत वाढवून मिळण्याबाबत विनंती केली. स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दिनांक १७ मार्च, २०२५ व दिनांक १९ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(४) अंशतः खरे आहे, गुंठेवारी व बांधकाम परवानाबाबत नगरपरिषदेस तक्रारी प्राप्त नाहीत.

मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये नगरपरिषदेच्या सर्व विभागांना सन २०२३-२४ च्या संचिका उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना दिल्या. त्यानुषंगाने नगरपरिषदेच्या दिनांक १८ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(५) हे खरे आहे,

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ मार्च, २०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र विधानमंडळास हक्कभंगाची सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या दिनांक ३० मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या हक्कभंग सूचनेच्या अनुषंगाने मुख्याधिकारी, बीड नगरपरिषद यांनी दिनांक ०९ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये विधानमंडळास खुलासा सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येल्लापूर या गावापासून तेलंगणा राज्याच्या सीमेपर्यंत जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील डांबरीकरणाचे काम करण्याबाबत

**(४) ७०६६ (१५-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येल्लापूर जिवती (जि.चंद्रपूर) या गावापासून तेलंगणा राज्याच्या सीमेपर्यंत असलेल्या मेडीगुडा, गादीगुडा या गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील डांबरीकरणाचे काम सात वर्षापूर्वी करण्यात आले असून सदर रस्त्यांची अत्यंत दूरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत या भागातील नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी राज्य शासनाकडे निवेदन देऊन दिनांक १ एप्रिल, २०२५ रोजी मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने मुख्य रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. जयकुमार गोरे (२९-०१-२०२६) :** (१), (२) व (३) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार येल्लापूर ते राज्यसिमा रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.३९ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्याची संपूर्ण लांबी डांबरी पृष्ठभागाची असून नादुरुस्त आहे. यास्तव सदर रस्त्याचे काम रस्ते दुरुस्तीच्या विविध योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) महापालिकेकडून गुंठेवारीची कामे करताना पूर्वीच्या आयुक्तांनी दिलेला आदेश रद्द करण्याबाबत

**(५) ७०९२ (२३-०८-२०२५). श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) महापालिकेकडून गुंठेवारीची कामे करताना पूर्वीच्या आयुक्तांनी दिलेला आदेश रद्द करावा व अनोंदणीकृत दस्तऐवज मिळकतीचा कायदेशीर पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात यावा अशी मागणी माजी नगराध्यक्ष यांनी इचलकरंजी महानगरपालिका आयुक्त यांचेकडे दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०१-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी महानगरपालिका हद्दीतील भूखंडांचे नियमितीकरण करताना अवलंबवयाच्या कार्यपद्धतीबाबत कार्यालयीन आदेश दिले असुन, उक्त आदेशानुसार, नियमाधीन करावयाचे प्राप्त प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करणेपूर्वी अनोंदणीकृत करारपत्रांची पडताळणी, मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह जिल्हा निबंधक, कोल्हापूर यांचे कार्यालयामार्फत करणे आवश्यक असलेबाबत नमुद आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील पोलीस वसाहतीची झालेली दुरवस्था

**(६) ७१०० (१९-०९-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमनेर (जि.अहिल्यानगर) शहरातील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याने पोलीस कुटुंबियांच्या सुरक्षेसाठी नवीन व सुसज्ज वसाहत उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने दखल घेऊन पोलीस वसाहतीच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे, बांधकाम आराखडा तयार करणे, प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी अतिरिक्त मुख्य सचिव, गृह विभाग यांच्याकडे सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१२-२०२५) :** (१), (२) व (३) शासनाच्या दिनांक ०७/०२/२०२२ च्या पत्रान्वये मंजूर केलेल्या बांधकामाच्या प्राधान्यक्रम यादीत संगमनेर पोलीस ठाणे इमारत व ८० निवासस्थान कामांचा समावेश आहे. सदर प्रकल्पांस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत संकल्प नकाशे बनविण्याचे काम प्रगतिपथावर अहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कृषी पंप ग्राहकांची वीज देयके माफ करण्याबाबत

**(७) ७१२५ (०८-०९-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.हारुन खान (वर्सोवा), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.राहूल पाटील**

**(परभणी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणकडील सर्व ग्राहकांच्या वीज देयकाची थकबाकी ७५ हजार कोटीहून तब्बल ९८ हजार कोटी रुपयांवर गेली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य सरकारकडून कोणताही लेखी आदेश नसतांनाही महावितरणने गेल्या तिमाहीमध्ये राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषि पंपाच्या वीज देयकाच्या थकबाकीची रक्कम वीज देयकामध्ये दाखविली नसल्यामुळे सुमारे ७५ हजार कोटी रुपयांची रक्कम आता वसूल करता येणार नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कृषी पंप ग्राहकांची थकबाकी माफ करून सदरील थकबाकीचा भार शासनाने उचलून महावितरणला कृषी पंपाच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे मार्च-२०२४ अखेर महावितरणची (लघुदाब व उच्चदाब) चालू वीज ग्राहक आणि कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडीत केलेल्या) सर्व ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी ८९,३१४ कोटी एवढी होती. सद्य:स्थितीत महावितरणची मार्च-२०२५ अखेरची सर्व ग्राहकांची वीज देयकापोटी एकूण थकबाकी ९७,१९५ कोटी एवढी आहे. सदर थकबाकीमध्ये कृषी ग्राहकांची थकबाकी रुपये ७६,५४५ कोटी तसेच सार्वजनिक पाणी पुरवठा व पथदिवे ग्राहकांच्या रुपये ७,३४५ कोटी थकबाकीचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

सर्व कृषीपंप ग्राहकांच्या वीज देयकामध्ये वीज बिलांची थकबाकी दर्शविण्यात येत आहे. कृषी पंप ग्राहकांच्या वीज देयकामध्ये (ऑनलाइन पद्धतीने) थकबाकी नियमितपणे दाखविण्यात येते. त्यामुळे सदर थकबाकी ग्राहकाकडून देय आहे. जे वीज ग्राहक वीज देयक भरणा मुदतीत करीत नाहीत अशा थकबाकीदार ग्राहकांना महावितरणचे कर्मचारी वारंवार वीज देयक भरणा करण्यासंबंधी पाठपुरावा करतात. तसेच थकबाकीदार ग्राहकांच्या भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे / तसेच call centre मार्फत वीज देयक भरणा करण्याबाबत सूचना देण्यात येतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य पोलीस दलात महिला पोलीसांचे प्रमाण वाढविण्याबाबत

**(८) ७१२७ (०७-०८-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र पोलीस दलात इंडिया जस्टिस रीपोर्ट २०२५ नुसार महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण केवळ १८.७% असून महिला अधिकाऱ्यांचे प्रमाण केवळ ६.८% असल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय गृह मंत्रालयाने आत्तापर्यंत एकूण सहा वेळा देशातील सर्व राज्यांना राज्य पोलीस दलातील महिला पोलिसांची संख्या ३३% पर्यंत वाढवण्याचे निर्देश दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस दलात महिलांचे प्रमाण कमी असल्यामुळे स्त्री अत्याचाराशी संबंधित गुन्ह्यांचा तपास फक्त महिला अधिकाऱ्यांनीच करण्याचे निर्देश पाळणे पोलीस दलास शक्य होत नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस दलातील महिलांचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे. महाराष्ट्र पोलीस दलामध्ये महिला पोलीस अंमलदारांचे (पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक) प्रमाण १८.९७% असून महिला पोलीस अधिकाऱ्यांचे प्रमाण (पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस महासंचालक) १४.९०% इतके आहे.
(२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २५.५.२००१ व दिनांक १५.१२.२०१७ नुसार शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थामधील सेवामध्ये भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.
(३) भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १८० अन्वये पोलीसांनी घ्यावयाच्या साक्षीदारांच्या तपासणीमध्ये भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम ६८, ६९, ७०, ७१, ७४, ७७, ७८, ७९ किंवा १२४ खालील अपराध किंवा अपराधाचा प्रयत्न स्त्रियांच्या बाबतीत करण्यात आला असल्याचे कथित असेल अशा बळीत स्त्रीचा जबाब हा महिला पोलीस अधिकारी किंवा कोणतीही महिला अधिकारी नोंद करतील अशी तरतूद आहे.

तसेच पोक्सो कायद्यान्वये लैंगिक अपराधापासून होणाऱ्या गुन्ह्यात पोक्सो कलम २४ अन्वये बळीत बालकांचा जबाब हा पोलीस उपनिरीक्षकापेक्षा निम्न दर्जा नसलेल्या महिला पोलीस अधिकाऱ्यामार्फत नोंदविण्यात येतो. स्त्री अत्याचाराशी संबंधित गुन्ह्यांचा तपास फक्त महिला अधिकाऱ्यांनीच करावा अशी कोणतीही तरतूद कायद्यामध्ये करण्यात आलेली नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(९) ७१४६ (२०-०७-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाचे दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यादरम्यान मुख्य कार्यालय सुरू करण्यात आले असून परळी वैजनाथ येथे प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्याची घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत पुणे येथील महामंडळाचे मुख्यालय कार्यरत आहे तथापि, पूर्णवेळ मुख्य अधिकारी नेमणूक झाल्याबाबतची माहिती उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे येथील मुख्यालयात आयएएस दर्जाच्या पूर्णवेळ अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची तसेच परळी वैजनाथ येथील प्रादेशिक कार्यालय तातडीने सुरू करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वरील मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (२६-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) पुणे येथील मुख्यालयात पूर्णवेळ अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.
तसेच परळी वैजनाथ येथील प्रादेशिक कार्यालयातील विभागीय व्यवस्थापक यापदाचा कार्यभार प्रादेशिक उपायुक्त, (समाज कल्याण) संभाजी नगर यांचेकडे सोपविण्यात आला असून त्यानुसार कामकाज सुरू आहे.
(४) राज्यस्तरीय कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, येरवडा, आळंदी रोड, पुणे येथे कार्यान्वित करण्यात आलेले आहे.
तसेच शासन निर्णय दिनांक २३.१२.२०२१ मध्ये नमुद केलेनुसार ता. परळी जि. बीड येथील विभागीय कार्यालय हे सुरु करण्यात आलेले आहे. सदर कालावधीमध्ये राज्यस्तरीय व विभागीय कार्यालयाकरीता अतिरिक्त कार्यभार अंतर्गत समाज कल्याण आयुक्तालयाच्या अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात येऊन महामंडळाचे कामकाज सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर शहर तसेच आसपासच्या परिसरात वारंवार हत्या होत असल्याबाबत

**(१०) ७१६५ (१९-०९-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहर तसेच आसपासच्या परिसरात वारंवार हत्या होत असूनही पोलीस संबंधित आरोपींना पकडण्यात अपयशी होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव नागरिकांमध्ये भिती तसेच असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.
नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सन २०२५ मे अखेरपर्यंत एकूण ४५ खुनाचे गुन्हे दाखल असून सर्व गुन्हे उघड असून एकूण १४९ पूरूष व ४ महिला आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
नागपूर शहरातील हत्याकांडाच्या व गुन्हेगारी घटना रोखण्याच्या दृष्टीकोनातून, समाजकंटकांमध्ये प्रतिबंध निर्माण करण्यासाठी खालीलप्रमाणे विविध पावले उचलण्यात आली आहेत:-
१) शरिराविरुद्ध गुन्हे करणारे गुन्हेगार, अवैधरित्या दारू व शस्त्र बाळगणारे, हॉटेल/लॉज/ढाबे/सावजी हॉटेल्स, हद्दपार, फरार व पाहिजे आरोपी तसेच हिस्ट्रीशीटर यांची वेळोवेळी तपासणी करून त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

२) शहरात गेल्या २० वर्षात नोंदवलेल्या सुमारे १९०० खून प्रकरणातील आरोपींचा आढावा घेऊन नमूद प्रकरणे हाती घेण्यात आली. अशा सुमारे ३००० गुन्हेगारांचे डोजियर (Dossiers) तयार करुन त्यांना पोलिस ठाण्यात बोलावण्यात आले. जेथे समुपदेशन / प्रतिबंधात्मक कारवाई करुन अशा निवडक गुन्हेगारांवर नियमित पाळत ठेवली जात आहे.

३) गुन्हेगारांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई राबविण्यात येत असून, गेल्या वर्षात MPDA अंतर्गत ६० आरोपींवर तर सन २०२५ मे अखेर पर्यंत २० आरोपींवर कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्गत सन २०२४ मध्ये एकूण १४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, सन २०२५ मध्ये मे अखेर पर्यंत मोक्का अंतर्गत ४ कार्यवाही करण्यात आली आहे.

४) सीआर.पी.सी कलम ११० (ई)(ग), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५-५७ व इतर कलमांखाली प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सन २०२५ मध्ये मे अखेरपर्यंत दाखल असलेल्या खूनाच्या ४५ गुन्ह्यांपैकी १८ गुन्ह्यांचा तपास पुर्ण करुन आरोपीं विरुद्ध पुरावे गोळा करून न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील महामेट्रोला शासनाने जमीन कायमची हस्तांतरीत केल्याबाबत**

**(११) ७१७२ (२३-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने नागपूर येथील सुमारे ४६ हजार चौरस मीटर जमीन फ्री होल्ड म्हणून कायमची हस्तांतरित केली असल्याचे माहे मे,२०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील महामेट्रो या जमिनीचे व्यावसायिकीकरण करीत असून मॉल, टॉवर व खासगी विकास कामांमध्ये रुपांतरित करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर जमीन पुन्हा ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (महामेट्रो) मार्फत नागपूर महानगर क्षेत्रामध्ये वाहतूक प्रणालीच्या सुधारणेकरीता नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्यात येत आहेत. महामेट्रोमार्फत उभारण्यात येत असलेल्या नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा-१ या प्रकल्पासाठी नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यासच्या मालकीच्या विविध जमिनी महामेट्रोला ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने हस्तांतरीत करण्यात आल्या होत्या.

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या उभारणीकरीता आंतरराष्ट्रीय बँकांकडून कर्ज घेण्यात आले आहे. सदर कर्जाच्या नियमित परतफेडीची तसेच प्रकल्पांच्या कार्यान्वयन व देखभाल दुरुस्तीची जबाबदारी महामेट्रोवर आहे. त्याचबरोबर प्रकल्पाची आर्थिक व्यवहार्यता सुनिश्चित करणे देखील आवश्यक आहे. याकरिता नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास यांच्याकडून मेट्रो प्रकल्पाकरिता महामेट्रोला भाडेपट्ट्याने हस्तांतरित केलेल्या जमिनींचा व्यावसायिक दृष्टिकोनातून विकास होण्याच्या दृष्टीने सदर जमिनी महामेट्रोला बिनशर्त मालकी हक्काने (फ्रिहोल्ड) जमिनी उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यानुसार, दिनांक २८/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास यांच्याकडून मेट्रो प्रकल्पासाठी भाडेपट्ट्यावर प्राप्त

झालेल्या जमिनी या महामेट्रोला कायमस्वरुपी (फ्रीहोल्ड) हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली. सदरहू शासन निर्णयानुसार महामेट्रोस प्राप्त झालेल्या जमिनीमधील बहुतांश जमिनी या मेट्रो स्थानकांच्या प्रवेश/निर्गमन, वायडक्ट, पार्किंग इत्यादी उपयोजनाकरीता आहेत. उर्वरीत जमिनीचा महामेट्रो मार्फत सार्वजनिक-खाजगी भागिदारी (पीपीपी) तत्वावर प्रचलित बांधकाम नियमावलीस अनुसरून वाणिज्यिक विकास करण्यात येत आहे. या माध्यमातून महामेट्रोला उत्पन्न प्राप्त होऊन महामेट्रो संस्थेस आत्मनिर्भर होण्यास मदत होणार आहे.

---

## मुंबईमध्ये भेसळविरहित दूध मिळण्याबाबत

**(१२) ७१७९ (१८-०८-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरिकांना भेसळविरहित दूध मिळावे याकरितामुंबईमध्ये येणाऱ्या १ लाख ५० हजार लीटर दुधाच्या नमुन्याची तपासणी केल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तपासणी मोहिमेमध्ये विविध १०८ कंपनीचे दुधाचे नमुने विश्लेषणासाठी घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दुधाच्या नमुन्याचा तपासणी अहवाल शासनाकडे सादर करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित अहवालामध्ये काय निदर्शनास आले व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (१९-०१-२०२६) :** (१) दिनांक ०१/०४/२०२५ व ०२/०४/२०२५ रोजी व त्या सुमारास बृहन्मुंबई विभागातील मानखुर्द, ऐरोली व दहिसर या तीन चेक नाक्यांवर दुध भेसळ तपासणी करिता चेक नाका मोहीम राबविण्यात आली होती. सदर मोहिमेवेळी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दुध वाहतूक करणाऱ्या ८० टैंकर / टेम्पो मधील दुधाची तपासणी करून एकूण १,५१,८९४ लिटर दुधाचासाठा तपासण्यात आला होता.

(२) हे अशंतः खरे आहे.

सदर तपासणी मोहिमेमध्ये दुध वाहतूक करणाऱ्या ८० टैंकर / टेम्पो मधून दुधाचे १०४ सर्वेक्षण व ४ नियमित असे एकूण १०८ दुधाचे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते.

(३) सदर तपासणी मोहिमेत घेण्यात आलेल्या दुधाचे १०४ सर्वेक्षण व ४ नियमित अशा सर्व दुधाच्या नमुन्यांचे अहवाल मुंबई प्रयोगशाळेतून आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांचेकडे प्राप्त झाले आहेत.

(४) सदर तपासणी मोहिमेत घेण्यात आलेले ४ नियमित नमुने प्रमाणित घोषित झाले असून १०४ सर्वेक्षण नमुन्यांपैकी ८६ नमुने प्रमाणित व १८ नमुने हे कमी दर्जाचे घोषित झाले होते.

कमी दर्जाचे १८ सर्वेक्षण नमुन्यांपैकी ०७ सर्वेक्षण नमुने हे केंद्रीय परवानाधारक उत्पादक आस्थापनांनी उत्पादीत केलेले असल्याने त्यासंदर्भात पुढील कार्यवाही करण्याबाबत केंद्रिय पदनिर्देशित अधिकारी तथा परवाना प्राधिकारी यांना इमेल व पत्राद्वारे कळविण्यात आलेले होते. तसेच उर्वरित ११ नमुने हे राज्य परवानाधारक उत्पादक आस्थापनांनी उत्पादीत केलेले असल्याने संबंधित कार्यक्षेत्राच्या पदनिर्देशित अधिकारी तथा परवाना प्राधिकारी यांना औपचारिक नमुने घेण्याबाबत इमेल व पत्राद्वारे कळविण्यात आलेले होते.

सदर ११ नमुन्यांसदर्भात राज्य परवानाधारक उत्पादक आस्थापनांमधून एकूण १३ औपचारीक नमुने घेण्यात आले होते ते सर्व प्रमाणित घोषित झालेले आहे. केंद्रीय परवानाधारक आस्थापनांनी उत्पादीत केलेल्या

दूधाच्या ०७ सर्वेक्षण नमुन्यांच्या अनुषंगाने ०६ केंद्रीय उत्पादक आस्थापनांमधून एकूण १० औपचारीक नमुने घेण्यात आले होते ते सर्व प्रमाणित घोषित झालेले आहे. ०१ सर्वेक्षण नमुन्याच्या प्रकरणात पुढील कार्यवाहीस्तव केंद्रिय पदनिर्देशित अधिकारी तथा परवाना प्राधिकारी यांच्याकडे पाठपुरवा सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शालेय शिक्षणात कृषी विषयाचे अध्यापन कृषी पदवीधरांमार्फत करण्यात येत असल्याबाबत

**(१३) ७१९४ (१९-०८-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०२१ मध्ये शालेय अभ्यासक्रमात कृषी विषय समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद यांना संयुक्तपणे अभ्यासक्रम रचना करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२४ या शैक्षणिक वर्षापासून शालेय शिक्षणात कृषी विषयाचा समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा तत्कालीन मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी सन २०२३ मध्ये केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कृषी विषयाचे अध्यापन कृषी पदवीधरांमार्फत करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-१२-२०२५) :** (१), (२), (३) व (४) शेती विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्याबाबत मा. मंत्री (शालेय शिक्षण) व मा. मंत्री, (कृषी) यांची संयुक्त बैठक, दिनांक २५.०८.२०२१ रोजी पार पडली. सदर बैठकीत कृषी या विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी संयुक्तपणे अभ्यासक्रम तयार करावा असा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) व महाराष्ट्र राज्य कृषी शिक्षण व संशोधन परिषद या संस्थांमधील तज्ञांची संयुक्त समिती गठीत करण्यात आली होती. तसेच, सदर समितीला सहाय्य व मार्गदर्शन करण्यासाठी कृषी महाविद्यालयातील १२ प्राध्यापकांची उपसमिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समिती, उपसमितीमार्फत शालेय अभ्यासक्रमात शेती विषयासंदर्भात समाविष्ट करावयाच्या घटक व उपघटकांवर इयत्तावार सखोल चर्चा करून दोन प्रकारचे मसुदे तयार करण्यात आले आहेत.
१. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात एकात्मिक स्वरूपात समाविष्ट करावयाचे घटक.
२. कृषी विषयाचे शालेय अभ्यासक्रमात इयत्ता नववी आणि इयत्ता दहावीसाठी स्वतंत्र विषय म्हणून समावेश करावयाचे घटक.

समितीने त्यांच्या अहवालात सर्व घटक, उपघटकांचा समावेश करताना इयत्तानुसार सुसंगतपणा, विद्यार्थाचा वयोगट, काठिण्यपातळी यांचा सखोल विचार केला आहे.

नवीन शिक्षण धोरणानुसार पुनर्रचित अभ्यासक्रमामध्ये कृषी विषयाचा / आशयाचा समावेश करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

पायाभूत शिक्षण अभ्यासक्रम-२०२४ (वय वर्षे ३ ते ८) मध्ये कार्यशिक्षण विषयांतर्गत बालकाच्या कारक कौशल्या बरोबरच २१ व्या शतकातील महत्वपूर्ण कौशल्ये, तसेच कृषी, पर्यटन व्यावसायिकतेचा पाया याच पायाभूत स्तरापासून घातला जाईल अशा उपक्रमांची मांडणी केली आहे. भारतातील शेतीचे महत्व, कृषी क्षेत्रातील मानवी (मानवी संसाधने) गुंतवणूक, शेतीचे लोकजीवनातील विशेष स्थान या सर्व बाबी विचार करता नव्या पिढीची नाळ कृषी क्षेत्राशी जोडण्यासाठी कृषी क्षेत्राचा, कृषी तंत्रज्ञानाचा विस्तार होण्यासाठी माती, पाणी, नौसार्गिक संसाधने, वनस्पती, स्थानिक पशुपक्षी या विषयातील अनेक उपक्रम सुचविलेले आहेत. तसेच, इयत्ता ३ री ते १० वी या शालेय स्तरावर कृषी विषय एकात्मिक स्वरूपात समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (२०२०) आणि राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा-शालेय शिक्षण (२०२३), राज्य अभ्यासक्रम आराखडा- शालेय शिक्षण २०२४ यांच्या मध्ये 'व्यवसाय शिक्षणाची नवकल्पना मांडली आहे.

विद्यार्थ्यांना शेती विषयक, यंत्र आणि सामुग्री विषयक आणि मानवी सेवा या क्षेत्रातील प्रकल्प दर वर्षी करायचे आहे. त्यामुळे शेती सारख्या परंपरागत विषयात सुध्दा नवीन तंत्रज्ञानाची ओळख विद्यार्थ्यांना होईल व कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारित साधने कसे वापरायची यांचा सुध्दा समावेश केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबत**

**(१४) ७२२६ (१९-०८-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.शंकर मांडेकर (भोर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) : त**सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शासकीय व अनुदानित शाळांमध्ये सन २०२५-२६ पासून केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) पॅटर्न राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने सीबीएसई अभ्यासक्रमाचे स्वरूप काय असून या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी नेमकी कोणत्या तारखेपासून व कोणत्या वर्गांपासून करण्यात येणार आहे, तसेच राज्य मंडळाच्या अभ्यासक्रमाशी त्याची सांगड कशी घालण्यात येणार आहे,

(३) असल्यास, सदर निर्णय घेण्यापूर्वी शिक्षकांना आवश्यक प्रशिक्षण देणे, विद्यार्थ्यांसाठी पुस्तके आणि इतर शैक्षणिक साधने उपलब्ध करून देणे, तसेच पालक व शिक्षक यांच्याशी सुस्पष्ट संवाद साधणे यासंदर्भात शासनाने कोणती खबरदारी घेतली वा घेण्यात आली आहे,

(४) असल्यास, सीबीएसई अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केल्यास स्थानिक जीवनाशी सुसंगत ज्ञान, स्थानिक भाषा व संस्कृतीवरील शिक्षण, तसेच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर व बौद्धिक विकासावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, याबाबत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२१-०१-२०२६) :** (१) NEP-२०२० ची अंमलबजावणी करण्यासाठी एनसीईआरटीने राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे. सदर अभ्यासक्रमाची राज्य स्तरावर अंमलबजावणी करण्यासाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात आलेला आहे.

राज्यात सन २०२५-२६ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करणे बाबत शासन निर्णय दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा-२०२४ (शालेय शिक्षण) मधील तरतुदी योग्य त्या बदलांसह टप्प्या-टप्प्याने लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मध्ये पुढीलप्रमाणे उल्लेख करण्यात आलेला आहे :-

विषय योजनेतील ठळक बाबी -

१. उच्च शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या देश पातळीवरील प्रवेश परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांना सुलभ व्हावी यासाठी विज्ञान, गणित, इंग्रजी, हिंदी, व्यावसायिक शिक्षण यांसारख्या विषयांची पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके NCERT ची (महाराष्ट्र राज्याशी समर्पक चित्रे, उदाहरणे समाविष्ट करून) जशीच्या तशी स्वीकारण्यात येतील.

२. मराठी, इतिहास, भूगोल यांसारख्या राज्य विशिष्ट विषयांबाबत पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके राज्याने तयार करावीत. तसेच NCERT कडील पाठ्यपुस्तकांना पूरक साहित्य, हस्तपुस्तिका इ. निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे मार्फत करण्यात यावी.

३. इतिहास, भूगोलसारख्या विषयांचा पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके तयार करताना आशयाचे प्रमाण स्थानिक, राज्य, राष्ट्रीय, जागतिक नुसार ठरविण्यात यावे.

४. अन्य भाषांसाठी पाठ्यपुस्तके NCERT / CBSE अथवा संबंधित राज्यांकडून घेऊन स्वीकारता येतील.

५. मराठी भाषेसाठी पाठ्यपुस्तके राज्याने तयार करावीत.

(३) राज्यासाठी तयार करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार, शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. सन २०२५-२६ मध्ये इयत्ता पहिली वर्गास शिकविणाऱ्या शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत आवश्यक त्या सुधारणा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्यामार्फत करण्यात येईल.

राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ मधील तरतुदीनुसार, राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांच्यामार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली पाठ्यपुस्तके, महाराष्ट्र राज्यासाठी आवश्यक असे सर्व बदल करून स्वीकारण्यात येत आहेत.

(४) CBSE हे एक परीक्षा मंडळ आहे. राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्र व पाठ्यपुस्तक निर्मिती ही NCERT कडून केली जाते. राज्यातील सर्व शाळांमध्ये सरसकट CBSE प्रमाणे उपक्रम तसेच NCERT अभ्यासक्रम या बाबी लागू करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या अंमलबजावणीनंतरचे कोणतेही नकारात्मक परिणाम निदर्शनास आलेले नाहीत.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) NCF-SE २०२३ वर आधारित व राज्याच्या अनुषंगाने आवश्यक बदल करून राज्य अभ्यासक्रम आराखडा (शालेय शिक्षण) २०२४ ची निर्मिती केलेली आहे. त्यामध्ये उल्लेखित अभ्यासक्रमाची ध्येये व अपेक्षित अध्ययन क्षमतांनुसार राज्यासाठी नवीन पाठ्यक्रम रचना करण्यात येत आहे. यानुषंगाने मूल्यमापन पद्धतीमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत. राज्याच्या गरजांनुसार आवश्यक बदल करण्यात येत आहेत.

(५) NCERT कडील पाठ्यपुस्तके काळजीपूर्वक तपासण्यात येत असून त्यामध्ये राज्याच्या अनुषंगाने बदल करुन राज्यासाठी पाठ्यपुस्तके बनविण्यात येत आहेत. याबाबत बालभारती व SCERT, Maharashtra संयुक्तपणे कार्यवाही करीत आहेत.

NEP २०२० अंमलबजावणी अंतर्गत शासनाने विविध उपक्रम हाती घेतलेले आहेत.

जसे - NEP २०२० अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी शासन निर्णय दिनांक २२/०६/२०२२ अन्वये NEP Task समिती स्थापन करण्यात आलेली आहे तसेच, शासन निर्णय दिनांक १६/०१/२०२३ अन्वये

आंतरविभागीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. शाळांमधील गुणवत्तेसाठी SQAAF- School Quality Assurance and Assessment Framework लागू करण्यात आले, अंगणवाडी शिक्षिकांसाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम निर्मिती करण्यात आली असून त्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गाढवी नदीवर (जि.गडचिरोजी) व पैनगंगा, वैनगंगा तसेच वर्धा नदीवर (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) बॅरेज बंधारा बांधणेबाबत

**(१५) ७२४६ (०८-०९-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देसाईगंज, आरमोरी (जि. गडचिरोली) या दोन्ही तालुक्यात वाहणाऱ्या गाढवी नदीवर बॅरेज बांधण्याबाबत येथील नागरीकांची मागणी होत असून याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच राजुरा (जि.चंद्रपूर) येथील कोरपना तालुक्यात पैनगंगा नदीवर कोडसी खु. व गोंडपिंपरी तालुक्यात वैनगंगा नदीवर विठ्ठलवाडा त्याचप्रमाणे राजुरा तालुक्यातील वर्धा नदीवर धिडसी, कढोली येथे बॅरेज बंधाऱ्याचे बांधकाम करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जलसंपदा मंत्री यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रस्ताव शासनाने मंजूर केल्यास “पाणी अडवा, पाणी जीरवा” ही संकल्पना शेतकऱ्यांसाठी महत्वाकांक्षी ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (१८-१२-२०२५) :** (१) अशी बाब नाही.
(२) होय, निवेदने प्राप्त.
कोरपणा तालुक्यात पैनगंगा नदीवर कोडसी खू. येथे बॅरेज बंधारा बांधकाम करणेबाबत - कोरपणा तालुक्यातील पैनगंगा नदीकाठी कोडसी (खु) हे गांव वैदर्भा नदी व पैनगंगा नदीच्या सांगमावर आहे. पैनगंगा नदीवर या विभागांतर्गत कोणतेही प्रकल्प सद्य:स्थितीत प्रस्तावित नाही. याबाबत महामंडळाने संबंधित विभागास मानचित्र अभ्यास करणेबाबत निर्देश देण्यात आले आहे.
वैनगंगा नदीवर विठ्ठलवाडा येथे बॅरेज बंधारा बांधकाम करणेबाबत - सदर निवेदनात नमूद असलेल्या विठ्ठलवाडा हे गाव येनबोथला बॅरेज अंतर्गत येत असलेल्या भन्नारहेटी उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात येत आहे. येनबोथला बॅरेज प्रकल्पाचा सद्य:स्थितीत पूर्व संभाव्यता अहवाल (PFR) व पाणी उपलब्धता प्रमाणपत्राचे काम प्रगतीपथावर आहे.
चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर तालुक्यामधून वाहणाऱ्या वर्धा नदीवरील आमडी बंधारा प्रस्तावित असून या बंधाऱ्याचे लाभक्षेत्र नदीच्या डाव्या बाजूस आहे. मात्र, धिडसी व कढोली गावे नदीच्या उजव्या बाजूस आहे. सदर

गावास पाणी उपलब्ध करून देणेबाबतचा अभ्यास करणे करीता महामंडळाने संबंधित विभागास सूचित करण्यात आले आहे.
(३) कोरपणा तालुक्यातील पैनगंगा नदीवर कोडसी खु. येथे बॅरेज/बंधारा घेणेबाबत संबंधित विभागाचा पूर्व संभाव्यता अहवाल (PFR) प्रचलित मापदंडात सफल ठरल्यास मंजूरीची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

वैनगंगा नदीच्या उजव्या तीरावर विठ्ठलवाडा हे गाव प्रगतीपथावर असलेल्या येनबोधला बॅरेज अंतर्गत भनारहेटी उसिंयोच्या लाभक्षेत्रात येत असून या बाबतचा पूर्व संभाव्यता अहवाल (PFR) प्रचलित मापदंडात सफल ठरल्यास मंजूरीची पुढील कार्यवाही करण्यात येईल.

राजुरा तालुक्यातील धिंडसी व कढोली गांवे हे वर्धा नदीच्या उजव्या तीरावर आहे याच क्षेत्रातील डाव्या तीरावर प्रस्तावित असलेल्या आमडी बॅरेज मधून सिंचनास्तव पाणी देण्याचे अभ्यास करण्यास्तव महामंडळाने संबंधित विभागास निर्देश देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरातील अंबाझरी तलावाच्या कामाला अडथळा येत असल्याबाबत**

**(१६) ७२७१ (१७-०६-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील अंबाझरी तलावाच्या पाण्याचा स्तर सुनिश्चित करण्यासाठी बसविण्यात येणाऱ्या दरवाजाच्या कामाला तेथे असलेल्या स्वामी विवेकानंद स्मारकामुळे अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने येणारे अडथळे दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी भरती प्रक्रिया व आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१७) ७२७३ (३०-०७-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात दोन दशकांपासून भरती प्रक्रिया बंद असल्याने एकेकाळी १५ हजारांवर असलेली अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात कमी झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाणीपुरवठयाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याने अधिकारी-कर्मचारी व्यथित झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन त्याअनुषंगाने सदर विभागात भरती प्रक्रिया तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२८-११-२०२५) :** (१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये दिनांक १६.०४.२००८ च्या कार्यालयीन आदेशानुसार एकूण ४८०९ मंजूर पदे होती. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या दिनांक १८.०६.२०२४ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी पदांचा नव्याने आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार नियमित आस्थापनेवर एकूण २२४० पदे मंजूर असून बाह्ययंत्रणेव्दारे घ्यावयाची मंजूर पदसंख्या १२०७ इतकी आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा सन १९९९, २००४, २००७, २०१३ व २०१४ अन्वये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील गट-अ संवर्गाची ७६ पदे व गट-ब संवर्गाची ३७५ पदे भरण्यात आली आहेत.

सन २०२३ पर्यंत गट-क संवर्गातील अनुकंपा भरती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात आलेली आहे. नवीन आकृतीबंधानुसार बाह्ययंत्रणेव्दारे १२०७ पदे भरती करण्याबाबत महाराष्ट्र्र जीवन प्राधिकरणाकडून क्षेत्रिय कार्यालयास सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र्र लोकसेवा आयोगाकडून स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ अन्वये उप अभियंता (स्थापत्य) या पदावर नेमणूकीकरीता १०९ व सहायक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) या पदावर ४९ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर उमेदवारांना नियुक्त देण्याची कार्यवाही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सुरु आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सरळसेवेच्या कोट्यातील २९० पदे शासनाने निर्धारीत केलेल्या संस्थेकडून भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मच्छिमारांना डिझेल परतावा देण्याबाबत**

**(१८) ७२७९ (२०-०७-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मासेमारी बोटींना डिझेलवर दिला जाणारा परतावा गत वर्षापासून शासनाकडून न मिळाल्याने मच्छीमार बांधव आर्थिक संकटात सापडले असून डिझेलसाठी अनेकांवर कर्ज घेण्याची वेळ आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे काय, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्रकिनाऱ्यावरच्या मच्छीमारांना मासेमारी बोटीसाठी लागणाऱ्या डिझेलवर प्रति लिटर १५ रुपये इतका परतावा मिळतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मच्छीमारांना डिझेल परतावा देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (०९-१२-२०२५) :** (१) हे, खरे नाही.
(२) हे, अंशत: खरे आहे.
मच्छिमारांना मासेमारी नौकेसाठी विक्री करण्यात येणाऱ्या डिझेल इंधन खर्चावरील अनुज्ञेय डिझेलवरील VAT कराचा परतावा मंजूर करण्यात येतो.
(३) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्यातील मासेमारी नौकांना रु.१२६.०० कोटी इतका डिझेल परतावा वितरीत करण्यात आला आहे.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात डिझेलवरील VAT कराची परतावाकरिता रू.१४७.७८ कोटी इतकी रक्कम अर्थ संकल्पित करण्यात आली आहे. त्यापैकी माहे जून २०२५ या महिन्यात रू. २८.४८ कोटी इतका डिझेल परतावा मच्छिमारांना वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील विविध ठिकाणी माती भराव सपाटीकरण व गौण खनिजाची वाहतूक याबाबतचा दंड स्वरुपातील शासनाचा महसूल वसूल करण्याबाबत**

**(१९) ७२८५ (१९-०८-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी माती भराव सपाटीकरण व गौण खनिजाची वाहतूक अशी शेकडो प्रकरणे प्रलंबित असून यातून दंड स्वरूपात मिळणारा कोट्यवधी रुपयांचा महसूल वसूल करण्यात प्रशासन उदासीन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माती उत्खननासंबंधित प्रकरण न्याय दंडाधिकारी वसई यांच्यासमोर सहा महिन्यापूर्वी दाखल करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाचा महसूल वसूल करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय हे अंशत: खरे आहे.
अनधिकृत डेब्रिज/ राडारोडा/ ईमारतीचा मलबा/ माती भराव संदर्भातील सहा महिन्यावरिल २१ प्रकरणे तहसिलदार वसई यांचेकडे सुनावणीसाठी आहेत. प्रकरणी कसूरदार यांनी सुनावणी अंती दिलेला खुलासा व सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी करून गुणवत्तेवर न्याययोचित आदेश पारीत करण्याबाबत तहसिलदार वसई यांचेस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) वसई तालुक्यातील तहसीलदार कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी केंद्रशासनाच्या प्रकल्पासाठी त्याच प्रमाणे इतर खाजगी गौण खनिजाची वाहतूक व माती भराव, मोठया प्रमाणात होत आहेत. त्याबाबत अनधिकृत उत्खनन/वाहतूक रोखण्याकरिता तहसिलदार वसई यांचे कार्यालयाकडून भरारी पथकाची नेमणूक करणेत आली आहे. सदर पथकामार्फत अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्या वाहन मालक यांचे विरूध्द दंडनीय कारवाई करण्यात येत आहे. अवैध गौणखनिज वाहतूक केल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या ४८ (७) व ४८ (८) नुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते. त्यानुसार वसई तालुक्यात तपासणी केलल्या वाहनांची संख्या १०७३ असून अवैध आढळून आलेल्या वाहनांची संख्या २५ आहे. तसेच वसुल करण्यात आलेल्या दंडाची रक्कम ४३ लाख इतकी आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पारनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्यात विजेची वाढती मागणी पाहता दोन स्वतंत्र उपविभाग होण्याबाबत

**(२०) ७२९५ (०८-०९-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्यात महावितरणचा पारनेर हा एकच उपविभाग सध्या कार्यरत असून पारनेर तालुका विस्ताराने मोठा असल्याने त्यावर मोठ्या प्रमाणात भार पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पारनेर तालुक्यात विजेची वाढती मागणी पाहता दोन स्वतंत्र उपविभाग होणे गरजेचे असल्याने त्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री व ऊर्जा राज्यमंत्री महोदयांना माहे मे, २०२५ मध्ये दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे,

(३) महावितरण कंपनीच्या नाशिक परिमंडळातील अहिल्यानगर मंडळांतर्गत अहिल्यानगर शहर तथा ग्रामीण विभागातील पारनेर उपविभागाचे विभाजन करुन सुपा उपविभाग निर्माण करण्याबाबतचा आदेश महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयामार्फत दिनांक २५.०९.२०२५ नुसार निर्गमित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यात औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण रोखण्याबाबत

**(२१) ७३०१ (०९-१०-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यात औद्योगिक वसाहतीतील ९०८४ कारखान्यांपैकी १ हजार ८८० कारखाने रेड झोनमध्ये असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रदूषणकारी कारखान्यांमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-१२-२०२५) :** (१) हे अंशत:खरे आहे.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांनी पारीत केलेल्या दिनांक १२/०२/२०२५च्या सुधारीत निर्देशानुसार ज्या उद्योगांचा प्रदूषण निर्देशांक ८० च्या वर आहे असे जिल्ह्यातील एकूण १६२१ उद्योग लाल संवर्गामध्ये मोडतात.

(२) हे खरे नाही.

जिल्हा आरोग्य अधिकारी, ठाणे, उपजिल्हा रूग्णालय, अंबरनाथ व नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याबाबतची तक्रार कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची संख्या व दुरुस्तीबाबत

**(२२) ७३९६ (१९-०८-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात एकूण २१२० जिल्हा परिषद शाळा कार्यरत असून त्या शाळांमध्ये ८३,४७५ मुले व ८४,०६७ मुली अशा एकूण १,६७,५४२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांपैकी डहाणू - ३२४, जव्हार - १५९, मोखाडा - १६२, पालघर - २२४, तलासरी - १४०, वसई- ८६, विक्रमगड - २६६, वाडा - १४३ या तालुक्यांतील एकूण १५०४ शाळा दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील शाळांच्या दुरुस्तीसाठी आवश्यक वित्तीय तरतूद करणे गरजेचे असून त्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१७-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) समग्र शिक्षा अंतर्गत सन २०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंत शाळा दुरूस्तीकरीता १०७ कामे मंजूर असून सदर दुरूस्तीकरीता रक्कम रू.५२९.१९ लक्ष निधी मंजूर झालेला आहे. सदर १०७ कामे पूर्ण झाले आहेत.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंत शाळा दुरूस्तीकरीता १११९ कामे मंजूर असून सदर दूरूस्तीकरीता रक्कम रू.५२९६.४६ लक्ष निधी मंजूर झालेला आहे. सदर मंजूर १११९ कामांपैकी ९८५ कामे पूर्ण झालेली असून १३४ कामे प्रगतीपथावर आहेत.

जिल्हा परिषद सेस फंड योजना अंतर्गत सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ पर्यंत शाहा दुरूस्तीकरीता ५२ कामे मंजूर असून सदर दुरूस्तीकरीता रक्कम रू.३०१.८४ लक्ष निधी मंजूर झालेला आहे.सदर मंजूर ५२ कामे पूर्ण झालेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोयना धरणातून वीज निर्मितीनंतर अरबी समुद्रात जाणारे ६८ टीएमसी पाणी मुंबईकडे आणण्याबाबत

**(२३) ७४०० (२४-०७-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणातून वीज निर्मितीनंतर ६८ टीएमसी पाणी वशिष्ठी नदीमार्गे अरबी समुद्रात जात असल्याने सदरचे अवजल पाईपलाईनद्वारे मुंबईला नेण्यासाठी शासनास सादर केलेल्या शिफारसीनुसार माहे एप्रिल, २०२५ मध्ये हवाई सर्व्हे केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सर्व्हेनंतर केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) तसेच कोयना धरणातून वीज निर्मितीनंतर अरबी समुद्रात जाणारे ६८ टीएमसी पाणी मुंबईकडे आणण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (२६-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

कोयना धरणातून वीज निर्मितीनंतर ६८ टीएमसी पाणी मुंबई, रायगड व रत्नागिरीला नेण्यासाठी शासनास सादर केलेल्या शिफारसीनुसार कोयना अवजल वापरासंदर्भात वॅपकॉस, नवी दिल्ली या संस्थेमार्फत पाईपलाईनच्या संरेखा व इतर भौगोलिक माहिती गोळा करण्यासाठी हवाई सर्वेक्षण करण्यात आले आहे.

(२) सदर सर्व्हेक्षण व आवश्यक अन्वेषणाच्या माहितीवर आधारित प्रकल्पाचा पूर्व व्यवहार्यता अहवाल मसुदा मार्च, २०२६ अखेर अभिकरणाकडून प्राप्त होणे अपेक्षित आहे. सदर अहवालामध्ये पाणी वळविणेविषयी शिफारशींचा अंतर्भाव असणार आहे.

(३) वॅपकॉस अभिकरणामार्फत प्राप्त होणाऱ्या पूर्व व्यवहार्यता अहवालातील तांत्रिक व आर्थिक बाबींचे अवलोकन करुन पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या विविध विभागांमधील अनुसूचित जमातींची ५० राखीव रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) ७४०२ (०८-०९-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या विविध विभागांमधील अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या ५० पदांवर बिगर आदिवासींच्या नियुक्त्या केल्या असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राखीव पदांमध्ये अवर सचिव, कक्ष अधिकारी, सहायक कक्ष अधिकारी, लिपिक टंकलेखक, उच्च श्रेणी लघुलेखक, लघु टंकलेखक आदी पदांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसून प्रशासनातील सर्व विभागांमध्ये राखीव पदांवर इतर संवर्गातील करण्यात आलेल्या नियुक्त्यांची सखोल चौकशी करुन त्याच संवर्गातील नियुक्त्या करण्यासंदर्भात पाठपुरावा करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन अनुसूचित जमातींची राखीव असलेल्या ५० पदांवर बिगर आदिवासींच्या नियुक्त्या केल्याबाबत तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये जे अधिकारी व कर्मचारी त्यांच्या मूळ नियुक्तीच्या पदावर कार्यरत असतील अशाच अधिकारी व कर्मचाऱ्यांची अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेली पदे सरळसेवेने भरण्याकरिता विशेष भरती मोहिम राबविण्यात यावी अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तत्पूर्वी, जातीच्या नामसाधर्म्यामुळे अनुसूचित जमातीच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या तथापि जातीचे प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना विविध शासन निर्णयाच्या आधारे शासन सेवेत संरक्षण देण्यात आले होते. तथापि, अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.१२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या. त्यानुसार मंत्रालयीन संवर्गात ज्या अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवेने अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्ती झाली. तथापि जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या अथवा अन्य मागासवर्ग जातप्रमाणपत्र अथवा वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्या ४६ तसेच अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे ज्यांच्या सेवा समाप्त केल्या असे ४ कर्मचारी मिळून ५० अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८.१.२०२० अन्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्या.

दिनांक २१.१२.२०१९ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या पदांपैकी मूळ नियुक्तीच्या सरळसेवेच्या पदावर कार्यरत असलेली ५ पदे सन २०२१ च्या परिक्षेमधून भरण्यात आलेली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वीज कामगारांना दैनंदिन भेडसावणाऱ्या समस्या मार्गी लावण्याबाबत

**(२५) ७४०६ (१९-०९-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वीज कामगारांच्या समस्या मार्गी लावल्या जात नसल्याने वीज कामगार संघटनांनी दिनांक २० मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान एक दिवसीय राज्यव्यापी संप करुन आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रतिकूल परिस्थितीत काम करणाऱ्या वीज कामगारांना दैनंदिन भेडसावणाऱ्या समस्या मार्गी लावण्यासंदर्भात मागण्या करण्यात आल्या असून मागण्याचे थोडक्यात स्वरूप काय आहेत,
(३) असल्यास, सदर मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने वीज कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०१-२०२६) :** (१) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन, महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत यूनियन तसेच, महाराष्ट्र राज्य विदयुत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समिती अंतर्गत महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन,सबॉर्डीनेट इंजिनिअर्स असोसीएशन, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय

विद्युत संघटन, महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस (इंटक), महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स यूनियन व तांत्रिक कामगार यूनियन या सहा संघटनांनी आंदोलनाची नोटीस दिली होती. परंतु, दरम्यान देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे संघटनाद्वारे संप मागे घेण्यात आला.

(२) महानिर्मिती/ महावितरण/ महापारेषण या तिन्ही कंपन्यांशी संबंधित मागण्यांचे थोडक्यात स्वरूप खालीलप्रमाणे आहे :-

१. नवीन कामगार संहितेस विरोध.

२. खाजगीकरण व कंत्राटिकरण याला विरोध

३. जलविद्युत निर्मिती केंद्रांचे खाजगीकरणास करण्यास विरोध.

४. कामगार आणि अभियंत्यांची सर्व रिक्त पदे भरा.

५. सर्व कामगार आणि अभियंत्यांना जुनी पेन्शन योजना लागू करा.

६. वेतन पुननिर्धारणातील ॲनॉमलीबाबत.

७. तिन्ही कंपन्यांतील ४३ हजार कंत्राटी कामगारांना कायम करणे.

(३) उपरोक्त मागण्या व संपाच्या अनुषंगाने शासनाने पत्र क्र. संकीर्ण -२०२५/प्र. क्र.६४/ऊर्जा-२ दिनांक ०९.०५.२०२५ अन्वये महानिर्मिती/महावितरण/महापारेषण यांना संयुक्त बैठकीचे आयोजन करणेकरीता निर्देश देण्यात आले होते.

त्यानुषंगाने,महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीस बैठकीस पाचारण करण्यात आले होते. परंतु दरम्यान देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे संघटनाद्वारे संप मागे घेण्यात आला असल्याचे दिनांक १४.०५.२०२५ च्या पत्रांन्वये कृती समितीमार्फत कळविण्यात आले. तसेच, कंपनी स्तरावरील प्रश्नांवर व्यवस्थापनाद्वारे बैठक आयोजित करुन प्रश्नांचे निराकरण करण्यात येते. उपरोक्त मागण्यांपैकी काही मागण्यांची पूर्तता खालीलप्रमाणे झाली आहे.

महापारेषण, महावितरण व महानिर्मिती कंपनीत विविध तांत्रिक व अतांत्रिक पदांची भरती सुरु असून पैकी सहाय्यक अभियंता पदाची भरती प्रक्रिया पूर्ण होऊन ४३१ अभियंते रुजू झालेले आहेत.

मा. संचालक (मासं), महावितरण यांच्या अध्यक्षतेखाली ॲनॉमली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेला अहवाल प्रशासनाने स्विकारला आहे.

(४) लागू नाही.

---

## मुल (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रूग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(२६) ७४०९ (१९-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुल (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रूग्णालयातील ७ वैद्यकीय अधिका-यांची पदे मान्य असून केवळ २ वैद्यकीय अधिकारी पदे नियमित व २ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदे भरण्यात आली असून एकाकडे अधिक्षक यांचा प्रभार देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालयात स्त्री रोग तज्ञ, बधिरीकरण तज्ञ व दंतशल्य चिकित्सक ही पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रूग्णालय, चंद्रपूर यांना दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१३-०१-२०२६) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे

स्त्रीरोगतज्ञ व भिषक हे पद रिक्त आहे, मात्र सा.रु. चंद्रपुर येथुन १ स्त्रीरोगतज्ञ व १ भिषक यांची सेवा मुल येथे संलग्न करण्यात आलेली आहे. बधीरिकरण हे पद रिक्त आहे मात्र आयपीएचएस अंतर्गत कंत्राटी पध्दतीने बधीरीकरणतज्ञांच्या सेवा देण्यात येतात. दंतशल्य चिकित्सक पद रिक्त झाल्यामुळे मुल येथुन जवळ असलेल्या ग्रा.रु. सिंदेवाही येथील दंतशल्य चिकित्सक यांची सेवा आठवडयातून दोन दिवस उजिरु, मुल येथे संलग्न करण्यात आलेली आहे

(३) हे खरे आहे.
(४) वैद्यकीय अधिकाऱ्यांची १४४० पदांची भरती करण्यासाठी दिनांक ०४.११.२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द केली असून पुढील कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या (एनएमसी) निकषानुसार वैद्यकीय अधीक्षक तसेच शिक्षकांची रिक्त पदे भरणेबाबत**

**(२७) ७४३३ (०८-०९-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.काशिनाथ महादु दाते सर (पारनेर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारित असलेल्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधीक्षकपदी राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या (एनएमसी) निकषानुसार प्राध्यापकाचा दर्जा असावा असा आदेश असतानासुध्दा या पदाची जबाबदारी सहयोगी प्राध्यापक व त्याच्या खालील वर्गाच्या अधिका-याकडे दिली जात असून मागील १४ वर्षापासून स्थायी वैद्यकीय अधीक्षकांचे पदे भरली गेली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पथकांनी केलेल्या तपासणीमध्ये एकही महाविद्यालयात राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेचे (एन एम सी) आवश्यक शिक्षक वर्गाचे निकष पूर्ण करू शकत नसल्याचा तपासणी अहवाल सन २०२४ -२५ या शैक्षणिक वर्षात शासनास उपलब्ध झाला असून सदर अहवालानुसार २५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयपैकी एकही वैद्यकीय महाविद्यालयात पूर्ण क्षमतेने प्राध्यापक ,सहयोगी प्राध्यापक आणि सहाय्यक प्राध्यापक उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवेत असलेल्या शिक्षकांवर कामाचा ताण वाढत असून अन्य जिल्हयापेक्षा, मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, नांदेड, लातूर येथील शासकीय  वैद्यकीय महाविद्यालयाची स्थिती थोडी चांगली असून रत्नागिरी, परभणी, सातारा, सिंधुदुर्ग, गोंदिया, अलिबाग, चंद्रपूर, जळगाव, धाराशिव, नंदूरबार येथील रुग्णालयांची स्थिती अत्यंत वाईट असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या (एनएमसी) निकषानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधीक्षक तसेच शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०७-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

वैद्यकीय अधिक्षक या पदाचे सेवाप्रवेश नियम अस्तित्वात नसल्याने राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या निकषानुसार ईच्छुक प्राध्यापक तसेच प्राध्यापक ईच्छुक नसल्यास सहयोगी प्राध्यापक यांना सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवून सदर पदे भरण्यात आलेली आहेत.
(२) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा सन २०२४-२०२५ चा तपासणी अहवाल आजतागायत या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. राज्यातील संचालनालयाच्या अधिपत्याखालील २५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात राष्ट्रीय वैद्यक आयोगाच्या मानकानुसार बहुतांश पदे भरलेली असुन उर्वरित पदे पुर्ण क्षमतेने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन प्राधान्याने सुरु आहे. तथापि, वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी पुरेसा अध्यापक वर्ग उपलब्ध आहे.
(३) हे खरे नाही.

सेवाप्रवेश नियमानुसार प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांची पदे ५०% सरळसेवेने व ५०% पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन सुरु आहे. नियमित स्वरुपात पदे भरेपर्यंत रिक्त असलेली प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांची पदे शासन निर्णय दिनांक ०९.०२.२०२२ व दिनांक २१.०८.२०२४ अन्वये कराराने भरण्यात येतात. तसेच सेवाप्रवेश नियमानुसार सहाय्यक प्राध्यापकांची पदे १००% सरळसेवेने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सदर पदे नियमित स्वरुपात भरेपर्यंत अधिष्ठाता स्तरावर शासन निर्णय दिनांक १८.०७.२०२४ अन्वये ३६४ दिवसांकरीता भरण्यात येतात. त्यामुळे सदरहू रुग्णालयांची स्थिती अत्यंत वाईट आहे.
(४) राष्ट्रीय वैद्यकीय परिषदेच्या निकषानुसार वैद्यकीय अधिक्षक या पदाचे सेवा प्रवेश नियम तयार झाल्यानंतर शिक्षकांची रिक्त पदे सेवा प्रवेश नियमांनुसार भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात लघुपट व माहितीपट निर्मितीसाठी शासनाने आर्थिक आणि धोरणात्मक उपाययोजना राबविण्याबाबत

**(२८) ७५०९ (०९-१०-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सामाजिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, आरोग्य व इतर जनजागृतीपर विषयांवर लघुपट व माहितीपट तयार करणाऱ्या निर्मात्यांना आवश्यक तेवढे प्रोत्साहन व आर्थिक सहाय्य उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील सांस्कृतिक, सामाजिक प्रश्न, परंपरा आणि चळवळींचा प्रभावी दस्तऐवजीकरण करणारे माध्यम म्हणून माहितीपट महत्त्वाची भूमिका बजावत असतानाही या क्षेत्राकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येत असून अशा प्रभावी माध्यमांचा उपयोग वाढविण्यासाठी कोणते धोरण राबविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा अधिकृत भाग म्हणून माहितीपट व लघुपट निर्मितीला समाविष्ट करण्याकरीता कोणती निर्णयप्रक्रिया राबविली आहे व सांस्कृतिक धोरणात याचा समावेश करण्यासाठी समिती किंवा तज्ज्ञ गट गठीत करण्यात आला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, डिजिटल माध्यमांद्वारे राज्यातील माहितीपटांचे आणि लघुपटांचे व्यापक प्रसार व वितरण सुनिश्चित करण्यासाठी कोणती यंत्रणा उभारली आहे तसेच ओटीटी प्लॅटफॉर्मसह भागीदारीसाठी कोणती योजना अस्तित्वात आहे,

(५) असल्यास, लघुपट आणि माहितीपट निर्मितीसाठी स्वतंत्र अनुदान योजना जाहीर करणे आवश्यक असताना सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केंद्र अथवा राज्याच्या निधीतून कोणती प्रक्रिया सुरु केली आहे व अशा योजनांचे प्रारूप तयार करण्यात आले आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२६-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

लघुपट व माहितीपट निर्माण करण्याकरिता दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये कार्यनियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) लघुपट व माहितीपट निर्मितीसाठी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ च्या शासननिर्णयान्वये कार्यनियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

लघुपट व माहितीपट निर्मितीसाठी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयान्वये दरवर्षी जास्तीत जास्त १० लघुपट/माहितीपट यांना रू.१०.०० लाखापर्यंत अनुदान अनुज्ञेय आहे.

वरील शासन निर्णयानुसार लघुपट व माहितीपट निर्मितीकरिता अनुदान देण्यासाठी "अ" व "ब" अशी शासकीय व अशासकीय समिती गठित केली आहे.

(४) सदर माहितीपट/ लघुपट हे अनुदान वितरीत केलेल्या संस्थामार्फत विविध माध्यमावर प्रसारीत करण्यात येतील. तसेच ओटीटी प्लॅटफॉर्म बाबत शासनाची योजना नाही.

(५) लघुपट व माहितीपट निर्मितीसाठी अनुदान देण्यासाठी शासन निर्णय दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ नुसार यापूर्वी योजना अस्तित्त्वात आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात काजूला हमीभाव मिळणेबाबत

**(२९) ७५२९ (१९-०८-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात काजू मंडळ माहे मे, २०२३ मध्ये स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळाच्या माध्यमातून उत्पादित काजूचा "स्वतंत्र ब्रँड" तयार करून त्याला 'जीआय' मानांकन मिळवून देणे, काजूची निर्यात वाढविणे, देशांतर्गत काजू व्यापाराला चालना देणे, काजू प्रक्रिया उद्योग उभारणे, काजू उद्योगातून उपपदार्थ तयार करणे, यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काजू उत्पादकांना प्रति किलो रु.१० एवढा भाव देण्याची घोषणा माहे जुलै, २०२४ मध्ये केली होती, त्यावेळी काजू हंगाम संपलेला होता आणि त्यातच जीएसटीची बिले मागून शासनाने काजू उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, काजूचा हमीभाव शासनाने निश्चित केला आहे काय,
(५) असल्यास, काजूला हमीभाव मिळण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-१२-२०२५) :** (१) हे खरे आहे.

राज्यातील काजू फळ पिकाच्या विकासाकरीता महाराष्ट्र राज्य काजू मंडळ दिनांक १६.०५.२०२३ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आले आहे.
(२) काजू मंडळाच्या कार्यामध्ये उत्पादित काजूचा "स्वतंत्र ब्रँड" तयार करून त्याला 'जीआय' मानांकन मिळवून देणे, काजूची निर्यात वाढविणे, देशांतर्गत काजू व्यापाराला चालना देणे, काजू प्रक्रिया उद्योग उभारणे, काजू उद्योगातून उपपदार्थ तयार करणे इ.बाबींचा समावेश असून, त्याअनुषंगाने काजु मंडळाकडून कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.
(३) सन २०२४ च्या काजू फळ पीकाच्या हंगामासाठी राज्यातील काजू उत्पादक शेतकऱ्यांनी विक्री केलेल्या काजू बी साठी प्रति किलो रु.१०/- याप्रमाणे किमान ५०किलो व कमाल २००० किलो या मर्यादेत शासन अनुदान देण्यास दिनांक ९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. शासन धोरणानुसार विक्री पावतीवर नोंदणीकृत खरेदीदाराचा जीएसटी क्रमांक असणे आवश्यक असल्याने, गैरव्यवहार टाळण्याच्या दृष्टीने काजू शेतकऱ्यांनी काजू बी ची विक्री केलेली जीएसटीची बिले मागवून या योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ४१९६ इतक्या शेतकऱ्यांना त्यांनी विक्री केलेल्या काजू बीसाठी प्रति किलो रु.१० याप्रमाणे एकूण रक्कम रु.४,९७,४६,९१०/- एवढे अनुदान वाटप करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सदर योजनेंतर्गत एकूण प्राप्त अर्जांपैकी त्रुटींची पूर्तता केलेल्या व छाननी अंती पात्र ठरलेल्या ३३० शेतकऱ्यांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये रु.३८.८८७३ लक्ष इतके अनुदान वाटप करण्यात आले आहे.
(४) नाही. हमीभाव देणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(३०) ७५४१ (०८-०९-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.तानाजी सावंत (परांडा), श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात विशेषत: लातूर, परभणी, धाराशिव व नागपूर येथे हजारो शेतकरी केंद्र व राज्य शासनाकडून मिळणाऱ्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान मिळत नसल्याचे माहे मार्च व मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अनुदान मिळण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे पाठवूनही अद्यापही प्रस्तावास मान्यता मिळाली नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचविण्यासाठी शासनामार्फत विविध मार्गाने प्रयत्न केले जात आहेत, परंतु, अनेक योजनांचे अनुदान वेळेत मिळत नसल्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडून त्यांच्यात असंतोष निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच राज्य शासनाच्या कृषी विभागाकडून कृषी यांत्रिकीकरण योजनेमध्ये शेतकऱ्यांना सहभागी होण्याकरिता शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे, परंतु पोर्टल वारंवार नादुरुस्त असल्यामुळे शेतकऱ्यांना या योजनेमध्ये सहभागी होण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पात्र शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनाचे अनुदान तातडीने मिळण्याच्या दृष्टीने त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करण्यास सोयीस्कर होण्याकरिता तसेच अनुदान देण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (०५-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) या योजनेसाठी सन २०२५-२६ करिता रु.५९६.५८ कोटी इतका वार्षिक कृती आराखडा दिनांक २२.०४.२०२५ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला आहे. दिनांक ०९.०५.२०२५ च्या शासन निर्णयानुसार पहिला हप्ता रु.२५१.४१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच दिनांक ०४.११.२०२५ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन घटकांतर्गत देण्यात येणाऱ्या पूरक अनुदानाकरिता रु.१००.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(४) हे खरे नाही.

सन २०२५-२६ मध्ये महाडीबीटी पोर्टलवर "प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य" या प्रक्रियेद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी सोडत पध्दतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येत होती. तसेच सन २०२५-२६ पासून महाडीबीटी पोर्टलवर शेतकऱ्यांना लॉगीन करण्यासाठी Agristack अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य केले आहे.

सदर बदल केल्याने सूरुवातीला पोर्टलवर कागदपत्रे अपलोड करताना अडचणी येत होत्या परंतु सद्य:स्थितीत महाडीबीटी पोर्टलवरील काम सुरळीत चालू आहे.
(५) प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) या योजनेसाठी सन २०२५-२६ करिता दिनांक ०९.०५.२०२५ च्या शासन निर्णयानुसार पहिला हप्ता रु.२५१.४१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

तसेच दिनांक ०४.११.२०२५ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन घटकांतर्गत देण्यात येणाऱ्या पूरक अनुदानाकरिता रु.१००.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी नवा प्रकल्प राबविण्याबाबत**

**(३१) ७५५३ (१७-०६-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर मध्ये अधिक लोकसंख्येला पाणीपुरवठा करण्यासाठी गेल्या काही वर्षात महापालिकेने एकही नवा

प्रकल्प राबविला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी पाण्याची वाढती मागणी व पाणी पुरवठयातील तफावत दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सध्या नागपूर शहरास कन्हान नदी व पेंच जलाशय या दोन स्त्रोतापासुन पाणी पुरवठा होत आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या व शहराचे विस्तारीकरण लक्षात घेता, नागपूर महानगरपालिकेने केंद्र शासन पुरस्कृत अमृत व अमृत २.० योजना राबविली आहे. यात प्रामुख्याने ३० जलकुंभाचे बांधकाम करण्यात आले आहे व दोन जलकुंभाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. आतापर्यंत एकुण ७३ कि.मी. मुख्य जलवाहिनीचे काम करण्यात आले असून ९ कि.मी. चे काम प्रगतीपथावर आहे व एकूण ७४२ कि.मी. वितरण जलवाहिनी टाकण्यात आली. टाकण्यात आलेल्या जलवाहिनी वरून आतापर्यंत १०५८२ नळ कनेक्शन करण्यात आले असुन काम प्रगतीपथावर आहे.
(२) नागपूर महानगरपालिकेची भविष्याची गरज व वाढती मागणी पाहता पाणीपुरवठा करण्यास्तव कन्हान नदीवर कन्हान-कोलार बँरेजच्या उभारणीचे काम महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे बरबडी ते सांगली (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३२) ७५८५ (२५-०८-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बरबडी ते सांगवी (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याचे काम गत ५ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ता मजबुती करणासाठी डांबरीकरणाचे काम करुन मिळण्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम मंत्री व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२९-०१-२०२६) :** (१), (२) व (३) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार बरबडी ते सावंगी (थडी) रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.१८ दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी २.५० कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्याचे सन २०१८-१९ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मंजूर असलेले रु.२५.९० लक्षचे

खडीकरणाचे काम सन २०२० मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर रस्त्याची संपूर्ण लांबी खडीकरणाची असून रस्त्याच्या सुरुवातीला व सा.क्र.०/६०० व ०/९०० या ठिकाणी पूल/मोरीचे बांधकाम करणे आवश्यक आहे. यास्तव सदर रस्ता/पूलाचे काम रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आलेल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील पारधी समाजातील कुटुंबांना विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ तसेच केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांचा लाभ मिळण्याबाबत**

**(३३) ७५९० (२१-०७-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरामध्ये २२२ आदिवासी पाडे व पारधी समाजाचे १०० कुटुंबे उपनगरात वास्तव्यास असून त्यांना आधारकार्ड अभावी विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ तसेच केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांचा लाभ मिळण्यासंदर्भात सेंटर फॉर प्रमोटिकल डेमॉक्रासी (सी.पी.डी.) या संस्थेने सर्व्हे केला असल्यामुळे दिनांक ४ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या कल्याणकारी योजनेचा लाभ देण्याबाबत तसेच आधारकार्डाची नोंद करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (०२-०१-२०२६) :** (१) मुंबई उपनगरातील आदिवासी पाडयांचे सेंटर फॉर प्रमोटिकल डेमोक्रासी (सी.पी.डी) या संस्थेने सर्वेक्षण केल्याचा अहवाल प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुंबई किंवा आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही.
(२) आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ संबधित प्रकल्प कार्यालयामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील पात्र आदिवासी लाभार्थ्यांना निधी उपलब्धतेनुसार देण्यात येतो.

अनुसूचित जमातीच्या लोकांना ज्यांच्याकडे शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जसे की, रेशन कार्ड, आधारकार्ड इत्यादी उपलब्ध नाही त्यांना अशी कागदपत्रे विशेष मोहीम राबवून उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी यांना सूचना देण्यात आलेल्या आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळाच्या विस्ताराबाबत**

**(३४) ७५९४ (०९-१०-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथे विमानाला दिनांक २६ एप्रिल, १९९३ रोजी अपघात झाल्यानंतर धावपट्टीची लांबी

वाढविण्यात आल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूसंपादन न झाल्यामुळे विमानतळाचा विस्तार झाला नसल्याने विमानतळाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विमानतळाचा विस्तार करणे व आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करण्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अधिक सुरक्षा आणि मोठ्या विमानासाठी व विमानतळाचा विस्तार करण्याकरिता जमीन भूसंपादन करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे विमानाला दिनांक २६ एप्रिल, १९९३ रोजी अपघात झाल्यानंतर धावपट्टीची लांबी सन १९९५ साली ४५९ मीटर व सन २००८ साली ५५० मीटर ने वाढविण्यात आली होती. आता या विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(२) विमानतळाचा विस्तार झाला असून, सन २००८ मध्ये नवीन टर्मिनल इमारत कार्यान्वित झाली आहे. त्यामध्ये आंतरराष्ट्रीय विमानसेवेसाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्तता करण्यात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(३) आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करण्यासाठी सीमा शुल्क व ब्युरो ऑफ इमिग्रेशन द्वारा अधिसूचित करण्याची आवश्यकता असते. सीमा शुल्क द्वारा सन २०१५ मध्ये अधिसूचना जारी करण्यात आली आहे. ब्युरो ऑफ इमिग्रेशन कडे त्यासाठी पाठपुरावा सुरू आहे.
(४) सद्यस्थितीमध्ये विमानतळाची धावपट्टी २७०० मी. असून मोठ्या विमानासाठी ३६०० मी. पर्यंत धावपट्टीचा विस्तार करण्याची कार्यवाही सुरू आहे. यासाठी १३९ एकर जमीन संपादनाची कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वरोरा (जि.चंद्रपूर) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण करणेबाबत

**(३५) ७६०४ (१९-०८-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण गजानन पेंढारकर न करता वरोरा तालुक्यातील जनतेला परिचित असलेल्या नावाने करणेबाबतची मागणी स्थानिक नागरिकांनी लोकप्रतिनिधींकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थेस गजानन पेंढारकर नावाऐवजी, डॉक्टर बाबा आमटे, दादासाहेब देवतळे, मा.सा.कन्नमवार या नावांची शिफारस करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. मंगलप्रभात लोढा (२४-११-२०२५) :**(१) ते (४) यापूर्वी सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना नावे नव्हती. त्यामुळे सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना थोर महापुरुषांची नावे देण्याचा निर्णय दिनांक ३०.९.२०२४ च्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. सदर निर्णयानुसार सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण

संस्थांचे नामकरण करण्यात आले आहे.

त्यानुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वरोरा, जि. चंद्रपूर या संस्थेचे नाव बदलून गजानन पेंढारकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वरोरा, जि. चंद्रपूर असे शासन निर्णय दिनांक १५.१.२०२५ अन्वये करण्यात आले आहे.

---

**युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळासाठी केंद्र सरकारकडून नामांकन करण्यात आलेल्या १२ किल्ल्यांसाठीच्या स्थळ योजनेबाबत**

**(३६) ७६२५ (०९-१०-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळासाठी केंद्र सरकारकडून नामांकन करण्यात आलेल्या राज्यातील १२ किल्ल्यांसाठीची स्थळ (साईट) व्यवस्थापन योजना तयार करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे नेमके स्वरूप काय आहे, त्यासाठी किती निधीची तरतूद केली आहे व किती निधी देण्यात येणार आहे,

(३) असल्यास, किल्ल्यांवरील अतिक्रमणे दूर करण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२६-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) युनेस्कोच्या मानांकन प्राप्त झालेल्या १२ किल्ल्यांमध्ये ८ किल्ले केंद्र संरक्षित स्मारके असून उर्वरीत ४ किल्ले राज्य संरक्षित स्मारके आहेत.

युनेस्को मानांकन प्राप्त झालेल्या १२ किल्ल्यांचे स्वतंत्र घटकनिहाय (अभ्यागत लोकसंख्याशास्त्र,स्थळ पायाभूत सुविधा, अभ्यागत सुविधा व्यवस्थापन, पायाभूत सुविधा, प्रस्तावित कनेक्टिव्हिटी पायाभूत सुविधा) स्थळ व्यवस्थापन आराखडे तयार करण्यात आले आहेत. केंद्र संरक्षित ८ किल्ल्यांच्या बाबतीत सदर आराखडयास अंतिम मंजुरी प्राप्त करण्यासाठी भारतीय पुरातत्व सर्वेक्षण व उर्वरीत ४ किल्लयांच्यासंबधी पुरातत्व व वस्तुसंगहालये संचालनालया यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे. सदर स्थळ व्यवस्थापन आराखडयास अंतिम मंजुरी प्राप्त झाल्यानंतर यास निधीची तरतूद करणे शक्य आहे.

(३) राज्यातील गड-किल्ल्यांवरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी तसेच पुन्हा अतिक्रमणे होवू नयेत, या करिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्र.स्मारके-२०२४/प्र.क्र.०६/सां.का.३, दिनांक २०.०१.२०२५ अन्वये जिल्हास्तरीय समिती गठित करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे-पानशेत रस्त्यावरील कुरण खुर्द येथील धरण काठालगतच्या वळणावर संरक्षक कठडे बसविण्याबाबत

**(३७) ७६३६ (२९-०६-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-पानशेत रस्त्यावरील कुरण खुर्द येथील धरण काठालगतच्या वळणावर सार्वजनिक बांधकाम विभागाने संरक्षक कठडे न बसविल्यामुळे मागील ५ ते ६ वर्षांत अनेक अपघात होऊन ८ ते १० नागरिकांचे मूत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित रस्त्यावर हायब्रीड ॲन्युईटी योजनेंतर्गत कोट्यवधी रुपयांची डागडुजी, डांबरीकरण व मजबुतीकरणाची कामे करण्यात आली तरीही रस्ता सुरक्षित करण्यासाठी संरक्षक कठडे बसविण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी रस्त्याच्या वळणांची जोखीम पाहून सुरक्षा मूल्यमापन (Road Safety Audit) केले होते काय तसेच या अपघातग्रस्त ठिकाणी संरक्षक कठडे उभारण्यासाठी विभागाकडे कोणते प्रस्ताव प्रलंबित आहे,

(४) असल्यास, रस्त्याच्या धोकादायक वळणांवर वाहन चालकांचा ताबा सुटून वाहन पाणलोट क्षेत्रात कोसळत असल्याचे निदर्शनास आले असून तातडीने कठडे उभारण्यासाठी विभागीय पातळीवर कोणती तातडीची उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन झालेल्या अपघातांमध्ये मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या प्रकरणांची गुन्हे/अपघात नोंदी व त्यासंदर्भातील तपास अहवाल यासंदर्भात तसेच संरक्षक कठडे बसविणाऱ्या संबंधित जबाबदार दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०७-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) डोणजे खानापूर पानशेत प्रजिमा ३७ या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सवलत करारनाम्याच्या (Concession agreement) तरतुदीप्रमाणे सुरक्षिततेच्या दुष्टीने आवश्यक ठिकाणी माहिती फलक व क्रॅश बॅरियर लावण्यात आले आहेत.

(३) व (४) सदर रस्त्याचे रस्ता सुरक्षा मूल्यमापन (Road Safety Audit) करण्यात आले होते. धोकादायक वळणावर क्रॅश बॅरियर लावण्यात आलेले आहेत.

(५) रस्त्याच्या या लांबीत संरक्षक कठडे नसल्याने अपघात झाल्याची नोंद संबंधित पोलीस स्थानकात आढळून येत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मानकापूर (जि.नागपूर) येथे भोंदूबाबाने अल्पवयीन मुलींना गुंगीचे औषध पाजून त्यांच्यावर अत्याचार केल्याबाबत

**(३८) ७६४१ (१९-०९-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानकापूर (जि.नागपूर) पोलीस ठाण्याच्या हद्दीत नग्नपूजा केल्यास पैशाचा पाऊस पाडून दाखवतो अशा प्रकारचे आमिष दाखवत एका भोंदूबाबाने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने तीन अल्पवयीन मुलींना गुंगीचे औषध पाजून त्यांच्यावर अत्याचार केल्याची घटना माहे एप्रिल, २०२५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा स्वरूपाची अंधश्रद्धा, जादूटोणा तसेच अघोरी प्रथा, परंपराना लोकांनी बळी ठरू नये म्हणून याविरोधात जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी आरोपींविरुध्द् गु.र.क्र.१६१/ २०२५, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ६४, ६५(१), ६९, ७४, ७५(१), ७५(२), ७६, १२३, १२६(२), ३५१(२), ३५२ सह लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ चे कलम ५(एच), ६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत आरोपी क्र.१ तुरुंगात असून उर्वरित ४ आरोपींना मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. तसेच सदर गुन्ह्यातील सर्व आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दिनांक १८.०६.२०२५ रोजी दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहेत.

जादुटोणा तसेच अघोरी प्रथा, परंपरांना लोकांनी बळी ठरु नये म्हणून याविरोधात जनजागृती करण्यासाठी अंधश्रद्धा निर्मुलन /जादुटोणा/ज्येष्ठ नागरिक धोरणानुसार प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये एक कक्ष स्थापन करून तेथे अधिकारी /अंमलदार यांची नेमणूक करून त्या माध्यमातून लोकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरोरा चिमूर सिमेंट रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३९) ७६८० (२३-०८-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा चिमूर रस्त्याचे काम गेल्या आठ वर्षापासून सुरू असून ते अद्याप पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिमेंट रस्त्यावर भेगा पडल्या असल्यामुळे दुचाकी व चार चाकी वाहनांचे नेहमी अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या संदर्भात वारंवार तक्रारी करून देखील संबंधित विभागाने कोणतीही प्रकारची उपाययोजना केलेली नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२९-०९-२०२५) :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे,

वरोरा-चिमूर हा राष्ट्रीय महामार्ग ३५३-E चा भाग असून, सदर काम राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागामार्फत प्रगतीत आहे. वरोरा-चिमूर या कामातील ४२.७५ कि.मी. लांबीपैकी ४१.५५ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झालेले आहे. (९७.०५ टक्के काम पूर्ण) उर्वरित १.२० कि.मी. लांबीचे काम सप्टेंबर-२०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. भूसंपादन, स्थानिक लोकांचा विरोध /अडचणी इत्यादीमुळे कामास विलंब झालेला आहे. रस्त्याच्या कामात पडलेल्या भेगांची दुरुस्ती कंत्राटदाराने स्वखर्चाने करण्यात येत असून आहे. तसेच रस्त्यावर भेगा पडल्याच्या कारणास्तव कोणत्याही अपघाताबाबत नोंद झालेली नाही.
(५) भूसंपादना अभावी, तसेच स्थानिक लोकांचा विरोध /अडचणीमुळे काम वेळेत पूर्ण करता आले नसून सद्यस्थितीत ४२.७५ कि.मी. लांबीपैकी ४१.५५ कि.मी. लांबीचे बांधकाम पूर्ण झालेले असून १.२ कि.मी. लांबीचे बांधकाम सप्टेंबर २०२५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**अंधेरी (पश्चिम) मुंबई येथील महिलेला शीतपेयातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर सामूहिक अत्याचार केल्याबाबत**

**(४०) ७६९८ (१९-०९-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डी.एन.नगर, अंधेरी (पश्चिम) येथील अपार्टमेंटमध्ये राहत असलेल्या तरुण महिलेला शीतपेयातून गुंगीचे औषध देऊन तिच्यावर सामूहिक अत्याचार व बलात्कार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबधितांविरुद्ध दिनांक ८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करुनही अद्यापपर्यंत अंधेरी पोलिसांनी आरोपीला अटक केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०१-२०२६) :** (१) खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी आरोपींविरुध्द् गु.र.क्र.१३०९/ २०२४, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ७०(१), ११५(२), ३५१(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी सर्व ३ आरोपींना अटक करण्यात येऊन सर्व आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात क्षयरोग निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना करणेबाबत**

**(४१) ७७२४ (१९-०९-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील एकूण क्षयरोग रुग्णांपैकी दहा टक्के रुग्ण हे राज्यात आढळून आले असून सन २०२४ मध्ये २,३०,५१५ (२ लाख ३० हजार ५१५) क्षयरोग रुग्ण आढळून आले असून या रुग्णांची दिवसेदिवस वाढती संख्या पहाता क्षयरोगासाठी समर्पित आरोग्य संस्था उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्षयरोग व श्वसनाच्या इतर आजाराचे एका ठिकाणी निदान व उपचार होण्यासाठी नागपूर शहरात सुसज्ज राष्ट्रीय आरोग्य संस्था स्थापन करण्यास मान्यता मिळविण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठवला जाणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन राज्यात क्षयरोग निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना करणे तसेच

नागपूर येथे क्षयरोग व श्वसनाच्या इतर आजारावर निदान व उपचार होण्यासाठी सुसज्ज राष्ट्रीय आरोग्य संस्था स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२५-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) (i) औंध उरो रुग्णालय, पुणे (ii) शिवडी टीबी रुग्णालय (मुंबई महानगरपालिका) (iii) क्षयरोग धाम, बुलढाणा (iv) शशीकला क्षयरोग रुग्णालय, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर (iv) जी. जी. राठी क्षयरोग रुग्णालय, अमरावती येथे क्षयरोगावर आवश्यक उपचार करण्यासाठी संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे नवीन संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(३) क्षयरोग दुरिकरणासाठी राज्यात करण्यात येत असलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत :-

क्षयरोगविरोधी औषधास प्रतिसाद न देणाऱ्या पात्र क्षयरुग्णांसाठी राज्यात नवीन बी-पाल्म (B-PalM) उपचार पध्दती सुरु करण्यात आली आहे.

नियमित सर्वेक्षणाव्यतिरिक्त राज्यात वर्षातून दोन वेळा सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम राबविण्यात येते. तसेच दिनांक ०७ डिसेंबर, २०२४ ते दिनांक २४ मार्च, २०२५ दरम्यान केंद्रिय क्षयरोग विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १०० दिवस मोहिम राज्यातील क्षयरोगासाठी अतिजोखमीच्या निवडक १७ ग्रामीण जिल्हे व १३ महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात आली. तसेच, सदर मोहिमेप्रमाणेच क्षयरोग मोहिम राज्यातील सर्व जिल्हे व महानगरपालिका कार्यक्षेत्रात माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत राबविण्याची कार्यवाही सुरु आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून राज्य शासनाने ८० डिजिटल हँड हेल्ड एक्सरे मशीन्स व २५४ Truenat मशीन खरेदी करुन जिल्हयांना वितरीत केलेल्या आहेत. तसेच, सीएसआर निधीमधून शासनास १०५ Truenat मशीन व ८ डिजिटल हँड हेल्ड एक्सरे मशीन्स प्राप्त झालेल्या आहेत व त्या जिल्हयांना वितरीत केलेल्या आहेत. क्षयरोग निदानासाठी सद्यस्थितीत राज्यात १७० CBNAAT व ६४९ Truenat मशीन उपलब्ध आहेत. तसेच, ९९ डिजिटल हँड हेल्ड एक्सरे मशीन्स व २,१४० सुक्ष्मदर्शक केंद्रे कार्यरत आहेत.

केंद्र शासनाच्या निक्षय पोषण योजनेअंतर्गत क्षयरुग्णांचे उपचारादरम्यान योग्य पोषण होण्यासाठी त्यांना उपचार सुरु असेपर्यंत दरमहा रुपये १०००/- त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहेत.

दिनांक ०३ सप्टेंबर, २०२४ पासून राज्यातील निवडक ४० एनटीईपी जिल्हयांमध्ये १८ वर्षावरील पात्र लाभार्थ्यांना भविष्यात क्षयरोग होऊ नये यासाठी बीसीजी लसीची एक अतिरिक्त मात्रा देण्यात येत आहे.

क्षयरुग्णांच्या सहवासात असलेल्या १८ वर्षावरील व्यक्तींची माहे नोव्हेंबर, २०२४ पासून Cy-TB चाचणी करुन व त्याखालील वयोगटातील व्यक्तींची चाचणी न करता त्यांना भविष्यात क्षयरोग होऊ नये म्हणून दर आठवडयाला क्षयरोग प्रतिबंधक औषधाची एक मात्रा याप्रमाणे ३ महिन्याकरिता क्षयरोग प्रतिबंधक उपचार (टीपीटी) देण्यात येत आहेत.

खाजगी क्षेत्रातील क्षयरुगांची वेळेत नोंदणी होण्यासाठी तसेच, या रुग्णांनाही शासकीय सेवा-सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्यातील सर्व ८० एन.टी.ई.पी. जिल्हयांमध्ये पी.पी.एस.ए. (PPSA- Public Private Support Agencies) या खाजगी संस्थांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे (i) औंध उरो रुग्णालय, पुणे (ii) शिवडी टीबी रुग्णालय (मुंबई महानगरपालिका) (iii) क्षयरोग धाम, बुलढाणा (iv) शशीकला क्षयरोग रुग्णालय, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर (iv) जी. जी. राठी क्षयरोग रुग्णालय, अमरावती येथे क्षयरोगावर आवश्यक उपचार करण्यासाठी संस्था कार्यरत आहेत. त्यामुळे नवीन संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लिंक स्कोअर मॉल, वांद्रे (पश्चिम) मुंबईमधील या मॉलला आग लागल्याबाबत**

**(४२) ७७२९ (१६-०७-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांद्रे, लिंक रोड येथील 'लिंक स्कोअर' मॉलमधील अग्निरोधक यंत्रणा कार्यरत नसल्याने मॉलला भीषण आग लागण्याची घटना दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही मुंबईत, भांडूप, मुंबई सेंट्रल, विलेपार्ले येथील मॉलमध्ये अशाच प्रकारे आग लागल्याच्या घटना घडल्याने अग्निप्रतिबंधात्मक यंत्रणेचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, काचेचे आच्छादन असणाऱ्या इमारती व मॉलमध्ये अग्निशमन सुरक्षा नियमाचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आले असून अग्निशमन दलाकडून सुरक्षा नियमावलीची नियमित तपासणी होत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन मॉलमध्ये अग्निशमन सुरक्षा नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत तसेच दोषी मॉल व्यवस्थापनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ कलम ३ (१), (२), (३) नुसार मॉल/इमारतीत बसविण्यात आलेली स्थायी अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची व त्यासाठी शासनाने नेमणूक केलेल्या लायसन्स प्राप्त अभिकरणाची नेमणूक करण्याची जाबाबदारी मालक/भोगवटादार यांची आहे.

तसेच सदर यंत्रणा कार्यान्वित ठेवून सहामाही अहवाल (फॉर्म बी प्रमाणपत्र) मालक/भोगवटादार यांनी प्रत्येक वर्षाच्या जानेवारी व जुलै या महिन्यामध्ये मुंबई अग्निशमन दलास सादर करणे बंधनकारक आहे.

मुंबई अग्निशमन दलामार्फत दर महिन्याला उपप्रमुख अग्निशमन अधिकारी ते केंद्र अधिकारी यांना नेमून दिल्याप्रमाणे यादृच्छिक (Randamly) पध्दतीने मॉल व इतर इमारतीची तपासणी करण्यात येते.

(४) भांडूप येथील ड्रीम्स मॉल, मुंबई सेंट्रल येथील आर्कीड सिटी सेंटर मॉल व वांद्रे येथील लिंक स्वेअर मॉल मधील आगीच्या घटनेच्या वेळेस अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित नसल्याचे आढळून आल्याने सदरहू मॉलच्या मालक/भोगवटादार यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ कलम ६ अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच सदर मॉल इमारतीच्या मालक/भोगवटादारावर न्यायालयात अभियोग दाखल करण्यासंबंधी विधी अधिकारी यांना कळविण्यात आले आहे. संबंधित मॉल इमारतीस फॉर्म बी प्रमाणपत्र देणाऱ्या लायसन्स प्राप्त अभिकरणाचे लायसन्स रद्द करण्याच्या कारवाईबाबत संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील टँकर चालकांनी संप सुरु केल्याबाबत

**(४३) ७७५४ (०८-०९-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मध्ये काही ठिकाणी भिषण पाणी टंचाई सुरु असल्याने अनेक भागामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील टॅकर चालकांनी आपल्या मागण्यांसाठी दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजीपासून संप सुरु केला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, टँकर चालकांनी केलेल्या मागण्या काय आहेत व सदर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर संप मिटविण्याच्यादृष्टिने व अनेक ठिकाणी टँकरने होणारा पाणीपुरवठा सुरळीत सुरु होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०१-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

मुंबई मधील उंच टेकडीवरील व पाणीपुरवठ्याच्या टोकाच्या भागातील रहिवाशांना काही वेळा काही विशिष्ट कारणाने मुख्यत्वे जल वाहिनीवरील गळती दुरुस्तीची काम, झडपा बदलणे, जलाशयामधील काही तांत्रिक समस्या निर्माण होणे अशा विविध कारणाने रहिवाशांना कमी दाबाने अथवा कमी प्रमाणात ठरावीक कालावधीसाठी पाणीटंचाई जाणवते. तसेच काही ठिकाणी म्हाडा, एस. आर. ए. अंतर्गत मोठया प्रमाणात गृह प्रकल्पांची निर्मिती होत आहे. या प्रकल्पामुळे पाणीपुरवठयाच्या मागणीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. अशा काही ठरावीक ठिकाणी नागरीकांना पाणी टंचाई जाणवते. अशा टंचाई काळामध्ये तात्पुरत्या स्वरुपामध्ये टँकरने पाणीपुरवठा होत असतो.

(२) होय, ही बाब खरी आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कीटकनाशक विभागामार्फत नवीन कुपनलिका व कंगन विहीरी खोदण्याची परवानगी दिली जाते व अस्तित्वात असलेल्या सरफेस वेलचे पाणी पिण्या व्यतीरिक्त इतर कामाकरिता वापरण्यासाठी परवानगी दिली जाते. या अनुषगांने कीटकनाशक विभागामार्फत सर्व विहीर मालकांना CGWA चे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबत प्रथमतः पत्र पाठवून सुचित करण्यात आले व पुरेसा अवधी देण्यात आला. मात्र ज्या विहीर मालकांनी सदर प्रमाणपत्र प्राप्त केले नाही अशा विहीर मालकांविरूद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३८१ / ३८१ अ अन्वये सुचना पत्रे बजाविण्यात आली.

सदर विहीर मालकांना सूचना पत्र बजविण्यात आल्या नंतर त्यांनी टँकर मालकांना विहीरीचे पाणी पुरविणे थांबविले. या अनुषगांने मुंबई वॉटर टँकर असोसिएशन यांनी दिनांक ११.०४.२०२५ रोजी पासून संप पुकारला. याव्यतिरिक्त सदर टँकर असोसिएशनच्या सदस्यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना विनंती केली की, कीटकनाशक विभागामार्फत करण्यात येत असलेल्या कायदेशीर कारवाया थांबविण्यात याव्या व केंद्रीय भुजल प्रधिकरण (CGWA) यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यासाठी मुदत द्यावी.

(४) संप मिटविण्याच्यादृष्टिने मुंबई वॉटर टँकर असोसिएशनच्या सदस्यांसोबत दिनांक १४.०४.२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांच्यासोबत सभा घेण्यात आली होती. सदर सभेदरम्यान आयुक्तांनी मुंबई वॉटर टँकर असोसिएशन यांनी केंद्रीय भूजल प्राधिकरण यांच्या अटींचे पालन करावे. तसेच आयुक्तांनी मुंबई वॉटर

टँकर असोसिएशन यांच्या अडचणी व मागण्यांबाबत जल शक्ती मंत्रालय, केंद्रीय भूजल बोर्ड, इत्यादी प्राधिकरणांना पत्र देवून कळविण्याचे आश्वासन दिले.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी व सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत**

**(४४) ७७६० (२४-०७-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांतील सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना "हेल्थ कार्ड" देण्याची तसेच सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतची योजना शासनाने मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही योजनांचे स्वरूप काय असणार आहे,
(३) असल्यास, सदर योजनांची अंमलबजावणी कोणत्या कालावधीत पूर्ण केली जाणार असून या योजनांच्या अंमलबजावणीसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-१२-२०२५) :** (१), (२) व (३) हेल्थ कार्ड बाबत : -

शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी बाबतच्या दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांच्यासोबत दिनांक १०.०३.२०२५ रोजी बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणी बाबत बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये पुढील विषयांबाबत चर्चा झाली -
i) शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी कार्यक्रम
ii) आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे ऑनलाईन ॲप
iii) शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य पत्रिका म्हणजेच हेल्थ कार्ड

तसेच, सदर बैठकीमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागास ऑनलाईन ॲप तयार करून त्या मार्फत सर्व विद्यार्थ्यांचे "हेल्थ कार्ड" तयार करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार, आकांक्षित चार जिल्हे (नंदुरबार, गडचिरोली, उस्मानाबाद, वाशिम) आणि राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम राबविण्यात येणारे पाच जिल्हे (धुळे, जळगाव, औरंगाबाद, नांदेड व बीड) हे एकूण ९ जिल्हे वगळता उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हा व तालुकास्तरावर या प्रकरणी समिती गठीत करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. या समित्यांची रचना तसेच कार्य याबाबत सदर शासन निर्णयात माहिती देण्यात आलेली आहे.

सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत: -

शासन निर्णय, दिनांक १३ मे, २०२५ अन्वये, राज्यातील सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या

शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत (प्रत संलग्न). सदर शासन निर्णयात सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत पुढील सूचना देण्यात आलेल्या आहेत : -

खाजगी व्यवस्थापनाच्या सर्व शाळांकरिता शाळा व परिसरातील मोक्याच्या ठिकाणी पर्याप्त संख्येने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक राहील. सदर कॅमेरे नियमितपणे कार्यरत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित शाळा व्यवस्थापनाची असेल. शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेली नाहीत अशा शाळांना कॅमेरे बसविण्याकरिता जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजना (DPC) अंतर्गत शालेय शिक्षण विभागाशी संबंधित योजनांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५ टक्के निधीचा वापर करता येईल असे नमूद करण्यात आले आहे. तसेच जिल्हास्तरावर उपलब्ध असणारे निधी, जसे की, खनिज निधी, विधिमंडळ व संसद सदस्य निधी, जिल्हा परिषदेमधील विकास कामाचे विविध निधी, इत्यादी निधी शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरिता वापरता येऊ शकतात. केवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे पुरेसे नसून ठराविक अंतराने त्यांचे फुटेज देखील तपासणी आवश्यक असून, असे फुटेज तपासण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असेल.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशांनुसार, विद्यार्थी सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयातील सुरक्षा उपाययोजनांबाबतची माहिती अपलोड करण्यासाठी शाळांसाठी एक पोर्टल विकसित करण्यात आले आहे. हे पोर्टल https://education.maharashtra.gov.in/school/users/studentSecurityPublic या वेबलिंकद्वारे सर्व सामान्य नागरिकांसाठी खुले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर महानगरपालिकेतील यांत्रिकी/ पाणीपुरवठा विभागातील**
**कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करण्याबाबत**

**(४५) ७७८८ (१७-०६-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहर महानगरपालिकेत यांत्रिकी / पाणीपुरवठा विभागातील कंत्राटी वाहन चालक व कर्मचारी गेल्या १० वर्षांपासून कार्यरत असून त्यांना अद्याप किमान वेतन लागू करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहन चालक व कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन लागू करून महानगरपालिकेच्या नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी नगरविकास मंत्री यांना दिनांक १५ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनारच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

यांत्रिकी व पाणी पुरवठा विभागात कंत्राटी वाहन चालक व कर्मचारी हे अंदाजे १० वर्षापासून बाह्यस्त्रोताद्वारे कार्यरत असून त्यांना कामगार विभागाच्या दिनांक २४ फेब्रूवारी, २०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार किमान वेतन देण्यात येते. तसेच शासनाद्वारे वेळोवेळी जाहीर करण्यात आलेल्या विशेष भत्त्याची रक्कमही देण्यात येते.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

वित्त विभागाच्या दिनांक ०२ फेब्रूवारी, २०१३ च्या परिपत्रकान्वये बाह्य यंत्रणेकडून कामे करुन घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सद्यस्थितीत बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना शासनाच्या नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत कोणतेही धोरण अस्तित्वात नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कडेगांव (जि.सांगली) तालुक्यात शासकीय कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) ७८०२ (०९-१०-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कडेगांव तालुक्यात शासकीय कार्यालयात कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कडेगाव पंचायत समितीतील ४० पदे, महसूल विभागातील १५ पदे, कृषी विभागातील १७ पदे, अशी अनेक कार्यालयातील पदे रिक्त असल्याने कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण वाढत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कडेगांव तालुक्यातील शासकीय कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०१-२०२६) :** (१), (२), (३) व (४) तहसिलदार, कडेगांव यांच्याकडून दिनांक ३१.१०.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त अहवालानुसार कडेगांव तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयात ४०७ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने वित्त विभागाने विहित केलेल्या प्रचलित धोरणानुसार/ कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि जिल्हाधिकारी, सांगली यांना कळविण्यात आले आहे.

---

**राज्यात पशुखाद्याचे दर नियंत्रणात आणण्यासह दुधाला योग्य भाव मिळण्याबाबत**

**(४७) ७८०९ (०६-१०-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढणारी नैसर्गिक संकटे, बाजारात शेतमालाला अपेक्षित मिळत नसलेला भाव यामुळे शेतकरी पुरक व्यवसाय म्हणून दूध उत्पादनाच्या व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात वळत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कवठे महाकांळ (जि.सांगली) तालुक्यातील घाटनांद्रे, तिसंगी, वाघोली, गर्जेवाडी, कुंडलापूर, जाखापूर व कुची या सात गावांसह ग्रामीण भागात दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय मोठया प्रमाणावर केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनावरांच्या वाढत्या किंमती, जनावरांच्या चाऱ्यावर होणारा खर्च, पशुखाद्याचे वाढते दर तर दुसरीकडे दूधाला मिळणारा भाव यामुळे दूध व्यवसायही अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पशुखाद्याचे दर झपाटयाने वाढल्याने वाढत्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत दुधाला मिळणारा दर अत्यंत कमी असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्यामुळे पशुखाद्याचे दर कमी करावेत व दुधाला किमान ८० ते ९० रुपये लिटर दर मिळावा अशी मागणी पशुपालकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, राज्य शासनाचे दूधाचे दर घसरल्याने दूध उत्पादकांना दिसाला देण्यासाठी माहे जुलै, २०२४ ते सप्टेंबर, २०२४ दरम्यान ५ रुपये तर माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२४ मध्ये प्रतिलिटर ७ इतके अनुदान जाहीर केले असून यामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती पशुखाद्याचे दर नियंत्रणात आणण्यासह दुधाला योग्य भाव मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-१२-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३), (४), (५) व (६) हे खरे नाही,

दुध उत्पादन हे गायी म्हशींची प्रजाती (ब्रीड), आरोग्य, भाकड काळाचे योग्य नियोजन, त्यांचे व्यवस्थापन आणि पशुखाद्यासोबतच इतर संतूलित पशुआहार इत्यादी सर्व बाबींवर अवलंबून असते. दुधव्यवसायात पशुखाद्याचे स्थान महत्वाचे असून पशुखाद्याचे दर हे पशुखाद्यासाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या उदा.चुनी, भुसा, मका, पेंड इत्यादींच्या किंमतीवर अवलंबून आहे. दुधउत्पन्नाचा खर्च कमी होऊन दुधव्यवसाय किफायतीशीर व्हावा यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रति हेक्टर प्रति लाभार्थी रु.४०००/- च्या मर्यादेत वैरण पिकांच्या बियाणांचे वाटप करणे, पशुधनास मोफत लसीकरण यासारख्या योजना राबविण्यात येत आहेत. राज्यात पशुखाद्य व वैरण विकासास प्रोत्साहन देण्यासाठी प्रकल्प किंमतीच्या ५० टक्के अथवा रु.५०.०० लक्ष पर्यंत अनुदान देण्यात येते. पशुधनास चांगल्या प्रतिचे पशुखाद्य उपलब्ध व्हावे यासाठी पशुखाद्याच्या पॅकींगवर पशुखाद्यात समाविष्ट असलेल्या अन्नघटक व त्याचे प्रमाण नोंदविणे शासन निर्णय दिनांक २२.०७.२०२४ अन्वये बंधनकारक करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांच्या दूधाला योग्य भाव मिळणेकरिता शासनाकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधासाठी दिनांक ०५.०१.२०२४, दिनांक १२.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.५/- प्रति लिटर दूध अनुदान योजना तसेच दिनांक २६.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.७/- प्रतिलिटर दूध अनुदान योजना राबविण्यात आलेली आहे.

शेतकऱ्यांच्या दूधाला योग्य भाव मिळणेकरिता शासनाकडून राबविण्यात आलेल्या दूध अनुदान योजनेतंर्गत सांगली जिल्ह्यामधील एकूण २२७९२ दूध उत्पादक शेतकऱ्यांना रु.५/- अनुदान योजनेतंर्गत माहे जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ या कालावधीसाठी एकूण रु.१४,९७,३२,६३५/- इतके अनुदान, माहे जुलै २०२४ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीसाठी एकूण ४१२९३ दूध उत्पादक शेतकऱ्यांना रु.४०,८२,६३,०३०/- इतके अनुदान व रु.७/- अनुदान योजनेतंर्गत एकूण ३३७९९ दूध उत्पादक शेतकऱ्यांना माहे ऑक्टोबर २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीसाठी एकूण रु.३५,२८,४२,६६५/- इतक्या दूध अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

**मौजे दरेवाडी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील पाझर तलावाची दुरुस्ती करणेबाबत**

**(४८) ७८१४ (१९-०९-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दरेवाडी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील मा.मुख्यमंत्री जलसंधारण योजना शासन निर्णय दिनांक १७/२/२०२१ अन्वये पाझर तलावाची दुरुस्ती करणेची मागणी स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल,२०२५ मध्ये मा.मंत्री (मृद व जलसंधारण), प्रधान सचिव (मृद व जलसंधारण) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे दरेवडी येथील जोंधळवाडी तळे, पवारवस्ती वरील काकरखोरा या दोन्ही पाझर तलावाची निर्मिती सन १९७२ मध्ये करण्यात आली असून सदर तलावांची गळती वाढल्याने पाणी टंचाई निर्माण होऊन शेतीला व पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले त्यानुषंगाने सदर पाझर तलावाची दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१२-०१-२०२६) :** (१) होय,

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने श्री. अमोल खताळ (संगमनेर), मा. विधानसभा सदस्य यांचे दिनांक २२.०४.२०२५ रोजीचे पत्र मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचेकडून दिनांक ०९.१०.२०२५ रोजी सचिव, मृद व जलसंधारण यांचे कार्यालयास प्राप्त झाले होते.

(२) होय,

मौजे दरेवाडी येथील जोंधळवाडी तळे व पवारवस्ती वरील काकरखोरा तळे असे दोन माती नाला बांध अस्तित्वात आहेत. सदर माती नाला बांध कामे ही २००४-०५ मध्ये करण्यात आली होती.

सदर माती नाला बांध मध्ये गाळ साचलेला असल्याने पाणी साठवण क्षमता कमी झालेली आहे. तसेच पाण्याची गळती होत असल्याने, साठविलेले पाणी पाझरले जावून माती नाला बांध कोरडा होत असून सदर गावामध्ये पाण्याची टंचाई निर्माण होत आहे.

(३) सदर तलावाची गळती कमी होण्याच्या दृष्टिकोनातून वनतलाव दुरुस्ती तसेच बंधा-याची सुमारे २ ते ३ मिटर उंची वाढवणे आवश्यक असल्याने, अंदाजपत्रके तयार करुन तांत्रिक मान्यतेसह प्राप्त झालेले प्रस्ताव उपवनसंरक्षक, अहिल्यानगर यांनी जिल्हा नियोजन समितीकडे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेकरिता सादर केले असून सदर कामांस प्रशासकीय मान्यता प्राप्त होताच त्यानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कौठे मलकापूर (ता संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) स्थापन करणेबाबत**

**(४९) ७८१५ (१९-०९-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कौठे मलकापूर (ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) स्थापन करण्याची मागणी स्थानिक नागरीक, लोकप्रतिनिधींनी माहे मे,२०२५ मध्ये मा. उद्योग मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील महाराष्ट्र शासनाची जमीन, गट क्रमांक (५३/१,४७,३३, १२८,११८, १०८,६९,४८,४४,४०/१,३९/१,१८,३४,२५,२६,२४५२८) उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त औद्यागिक वसाहत निर्माण झाल्यास रोजगार निर्मिती होवून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होतील म्हणून ग्रामसभेने सदर कामासाठी मदत करण्याचा ठराव मंजूर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने उक्त औद्यागिक वसाहत निर्माण करुन स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२९-०१-२०२६) :** (१) व (२) होय, हे अशंत: खरे आहे.

मौजे कौठे मलकापुर (ता. संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाच्या वतीने औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४/०३/२०२५ व दिनांक ०९/०७/२०२५ रोजी निवेदनाव्दारे मागणी केली आहे. सदर निवेदनावर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास दिलेले आहेत.

सदर निर्देशानुसार प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ, अहिल्यानगर यांनी दिनांक १४ जुलै, २०२५, दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये उप जिल्हाधिकारी (महसुल) अहिल्यानगर, उप विभागीय अधिकारी संगमनेर, तहसिलदार संगमनेर यांना मौजे-कौठे-मलकापुर येथील सरकारी गटातील शासकीय व त्यालगत खाजगी क्षेत्र असे सलग किती क्षेत्र प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रासाठी उपलब्ध होवु शकेल ? शासकीय क्षेत्रामधुन काही क्षेत्र विविध योजनासाठी वाटप झालेले असल्यास त्याबाबतची सविस्तर माहीती उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर मऔवि अधिनियम १९६१ नुसार भूसंपादन कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) वरील १ व २ येथे नमूद केल्याप्रमाणे उप जिल्हाधिकारी (महसुल) अहिल्यानगर, उप विभागीय अधिकारी संगमनेर, तहसिलदार संगमनेर यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर मऔवि अधिनियम १९६१ नुसार भूसंपादन कार्यवाही करण्याची तजवीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली, मिरज शहरातील स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंटच्या प्रस्तावाबाबत

**(५०) ७८५४ (०८-०९-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी क्लायमेट रिजिलिन्स डेव्हलपमेंट प्रोग्रामाला जागतिक बँकेने मंजूरी दिली असून सांगली, मिरज शहरातील स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंटचे दोन टप्प्यातील प्रस्ताव तयार केले आहेत , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या टप्प्यातील ६१९ कोटींचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे मंजूरीसाठी माहे मार्च, २०२५ मध्ये पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरच्या प्रस्तावाला त्वरीत मंजूरी देऊन प्रत्यक्षात कामाला सुरुवात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (३०-१२-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहरातील स्टॉर्म वॉटर मॅनेजमेंटच्या पहिल्या टप्प्यातील प्रस्ताव तयार केला आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर कामास महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थान, मदत व पुनर्वसन) शासन निर्णय दिनांक २३ मे, २०२५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. कामाची निविदा दिनांक ७ ऑगस्ट, २०२५ रोजी प्रसिध्द केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.